रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३५६
www.ramprahar.com

◆ मंगळवार, १४ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## माथाडी, हमाल, श्रमजीवी कामगार कायद्यांमध्ये होणार सुधारणा



**मुंबई :** राज्यातील माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगारांच्या सुरक्षा व कल्याणासाठी लागू असलेल्या विविध कामगार कायद्यांमध्ये कालसुसंगत सुधारणा करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. कामगार विभागाच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या या सुधारणांच्या आराखड्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि.१३) आढावा बैठक पार पडली. या बैठकीला कामगार मंत्री आकाश फुंडकर प्रत्यक्ष उपस्थित होते, तर कामगार राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे बैठकीत सहभाग घेतला. केंद्रीय कामगार कायद्यांशी सुसंगत अशी राज्याची नियमावली तयार करताना या सुधारणांमधून व्यापक कामगार हित जपण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले जावे, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले तसेच राज्याच्या हितासाठी आवश्यक असलेल्या काही स्थानिक सुधारणांचाही यात समावेश करावा, अशी सूचना केली.

**अंतरंग**

रायगडात ८,९१४ शेतकऱ्यांना कर्जमाफी/२

शाळाबाह्य मुलांसाठी राजिपची विशेष शोधमोहीम/५

क्रिकेटच्या पंढरीत भारतीय महिलांचा ऐतिहासिक विजय/८

# एसटी महामंडळाला सक्षम करणार : मुख्यमंत्री

## डेपोनिहाय स्वतंत्र विकास आराखडा तयार करण्याचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) डेपोच्या पुनर्विकासातून उत्पन्न वाढवून महामंडळ आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने कार्यवाही करण्यात यावी. प्रत्येक डेपोची क्षमता लक्षात घेऊन स्वतंत्र विकास आराखडा तयार करावा तसेच सार्वजनिक–खासगी भागीदारीच्या माध्यमातून पुनर्विकासाला गती देण्यासाठी आवश्यक धोरणात्मक प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली परिवहन विभागाची बैठक सोमवारी (दि.१३) वर्षा या शासकीय निवासस्थानी झाली. या बैठकीस परिवहनमंत्री प्रताप सरनाईक, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, ओ.पी. गुप्ता, विकासचंद्र रस्तोगी, नियोजन विभागाच्या सचिव ए. शैला, महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, एसटी डेपो विकसित करताना प्रत्येक डेपोची व्यावसायिक क्षमता लक्षात घेऊन स्वतंत्र नियोजन करण्यात यावे. आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य प्रकल्पांमधून प्राप्त होणारा निधी एस्क्रो खात्यात जमा करून त्याचा वापर इतर विकास प्रकल्पांसाठी करण्यात यावा. सार्वजनिक–खासगी भागीदारी (पीपीपी) धोरणांतर्गत विकासकांना देण्यात येणाऱ्या सवलतींबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

एसटी महामंडळाच्या जागांची मालकी कायम महामंडळाकडेच राहील यासाठी ४९ अधिक ४९ वर्षांच्या लीज मॉडेलचा विचार करण्यात येत असून त्यामुळे जागांचे प्रभावी व्यावसायिक मूल्यवर्धन साधता येईल, असे सांगून प्रकल्पांसाठी स्टॅम्प ड्युटी सवलतीसंदर्भातील कायदेशीर बाबींची तपासणी करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

प्रवाशांना अधिक सुलभ व अखंडित सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी एसटी डेपो, मेट्रो आणि अन्य सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे एकात्मिक नियोजन करून मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट हब विकसित करण्यावर भर देण्याचेही निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

# जेजुरीजवळ दिंडीमध्ये भीषण अपघात

## ट्रकच्या धडकेत तीन वारकरी महिलांचा मृत्यू; पाच जण जखमी

**जेजुरी : प्रतिनिधी**



आषाढी वारी सोहळ्यासाठी पंढरपूर येथे पायी चाललेल्या संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी दिंडीत सोमवारी (दि.१३) मोठी दुर्घटना घडली. सासवड–जेजुरी मार्गावर बेलसर परिसरात एका टेम्पोने दिलेल्या धडकेत तीन वारकरी महिलांचा मृत्यू, तर पाच जण जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार दुसऱ्या दिंडीतील ट्रकने बेलसर टोलनाक्याजवळ वारकऱ्यांना धडक दिली. या अपघातात सांगली जिल्ह्याच्या मिरज तालुक्यातील नंदा पवार (६०, कवलापूर), माधवी राजाराम सलगरे (५५, मालगाव) आणि राजश्री शंकर भोसले (५५, कसबे डिग्रज) यांचा मृत्यू झाला, तर अक्काताई बबन कोळी, शांता शिवबा कालकोपर, कासाबाई रास्ते, लक्ष्मी विठ्ठल गर्दे आणि शामराव चव्हाण जखमी झाले आहेत. जखमींवर उपचार सुरू आहेत. दरम्यान, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जेजुरीजवळ भीषण अपघातात मृत्यमुखी पडलेल्या तीन वारकरी महिलांच्या नातेवाइकांना पाच लाखांची मदत जाहीर केली आहे. त्यांनी एक्स पोस्टमध्ये लिहिले की, तीन वारकऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना अत्यंत वेदनादायी आहे. या दुर्घटनेतील मृत वारकऱ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. मृतांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारतर्फे प्रत्येकी पाच लाखांची आर्थिक मदत दिली जाईल तसेच अपघातातील जखमी वारकऱ्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर आवश्यक उपचार सुरू आहेत.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विक्रम



**सर्वाधिक काळ सीएम राहिलेल्या नेत्यांमध्ये तिसऱ्या स्थानी घेतली झेप**

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या राजकारणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर एक नवा विक्रम नोंदविण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेल्या नेत्यांमध्ये फडणवीस आता तिसऱ्या क्रमांकावर आले आहेत.

देवेंद्र फडणवीस यांचा मुख्यमंत्रिपदाचा एकूण कार्यकाळ २,४३० दिवस (सुमारे सहा वर्षे सात महिने) इतका झाला असून त्यांनी शरद पवार (२,४१२ दिवस) यांना मागे टाकत महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेल्या नेत्यांच्या यादीत तिसरे स्थान पटकावले आहे.

सर्वाधिक काळ मुख्यमंत्रिपदाचा विक्रम वसंतराव नाईक यांच्या नावावर आहे. ते सर्वाधिक चार हजार ९६ दिवस मुख्यमंत्री होते, तर त्यांच्यानंतर दुसऱ्या स्थानी राहिलेले विलासराव देशमुख दोन हजार ६८६ दिवस मुख्यमंत्री होते. दरम्यान, राज्यात सलग पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणारे नाईक यांच्यानंतर फडणवीस हे केवळ दुसरेच मुख्यमंत्री आहेत.

# पनवेलजवळील आदई डोंगरावर वृक्षारोपण अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत पनवेलजवळील आदई डोंगरावर भव्य वृक्षारोपण अभियानाचे आयोजन करण्यात आले. या अभियानाला भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी त्यांनी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने दरवर्षी किमान एकतरी झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले तसेच वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि जंगलतोड यामुळे वृक्षारोपणाचे महत्त्व अधिक वाढले असून पर्यावरण संरक्षणासाठी लोकसहभाग अत्यावश्यक असल्याचेही नमूद केले.



आदई हिल येथील वनविभागाच्या जागेत गेल्या १२ ते १३ वर्षांपासून विविध स्वयंसेवी संस्था व पर्यावरणप्रेमींच्या माध्यमातून सातत्याने वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाचे कार्य सुरू आहे. या कालावधीत १० हजारांहून अधिक झाडांची लागवड करण्यात आली असून त्यांचे संगोपनही स्वयंसेवकांच्या मदतीने केले जात आहे. स्थानिक नागरिकांच्या वर्गणीतून झाडांना

**आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती**

**प्रत्येकाने झाड लावून संगोपन करण्याचे आवाहन**

पाणीपुरवठा करण्यासाठी दोन लहान बंधारे उभारण्यात आले आहेत, मात्र ते अपुरे पडत असल्याने त्यांच्या वरच्या बाजूस मलबा काढून आणखी दोन बंधारे उभारण्यात यावेत, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे करण्यात आली. यामुळे पाणी साठविण्याची क्षमता वाढून वृक्षसंवर्धनाला मोठी चालना मिळेल, असे पर्यावरणप्रेमींनी सांगितले तसेच मान्सूननंतर डोंगरावर लागणाऱ्या वणव्यांवर नियंत्रण, आग प्रतिबंधक उपाययोजना आणि वृक्षसंवर्धनासाठी शासनाची मदत मिळावी, अशीही मागणी करण्यात आली.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करत वृक्षारोपण ही केवळ एका दिवसाची मोहीम नसून भावी पिढ्यांसाठीची अमूल्य गुंतवणूक असल्याचे सांगितले. प्रत्येक नागरिकाने किमान एकतरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि जैवविविधतेचे संरक्षण यासाठी वृक्षांचे अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना स्पष्ट केले. **(पान २ वर..)**

## निवडक

### बँकॉकमध्ये पबला आग लागून २७ जणांचा होरपळून मृत्यू

**बँकॉक :** थायलंडची राजधानी बँकॉक रविवारी रात्री एका भयंकर दुर्घटनेने हादरून गेली. एका प्रसिद्ध पबमध्ये लागलेल्या भीषण आगीत २७ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून ६०पेक्षा अधिक जण गंभीररीत्या होरपळले आहेत. जखमींवर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत. प्राथमिक तपासानुसार या दुर्घटनेमागे विद्युत यंत्रणेतील बिघाड (शॉर्टसर्किट) हे मुख्य कारण असल्याचे समोर आले आहे.

### अमेरिका–इराण संघर्ष वाढला; एकमेकांवर जोरदार हल्ले

**तेहराण :** अमेरिकेने केलेल्या हल्ल्यानंतर इराणनेही आखाती देशांमधील अमेरिकन एअरबेसवर जोरदार हल्ला केल्याचा दावा केला आहे. अमेरिकेचे पेट्रियट एअर डिफेन्स सिस्टम आणि रडार यंत्रणा उद्ध्वस्त केल्याचे इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सने म्हटले आहे. दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुझ सामुद्रधुनीत पुन्हा नाकेबंदी लागू करण्याची घोषणा केली असून तेथून जहाजांच्या सुरक्षेच्या बदल्यात २० टक्के शुल्क आकारणी करणार असल्याचे म्हटले आहे.

# सीकेटी महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

## ध्येयावर लक्ष केंद्रित करा –प्रभारी अधिष्ठाता डॉ. कविता लघाटे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

"आजचे जग स्क्रीन आणि तंत्रज्ञानाने व्यापले असले, तरी माहितीच्या महासागरात वाहवत न जाता विद्यार्थ्यांनी भानावर राहून आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. केवळ मोठे होण्याचे स्वप्न पाहणे पुरेसे नाही, तर ते साकार करण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न आणि शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सामाजिक बांधिलकीही जोपासली पाहिजे," असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठाता डॉ. कविता लघाटे यांनी केले.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्यालयात प्रथम, द्वितीय, तृतीय वर्ष पदवी, पदव्युत्तर वर्गातील व पीएचडी पुरस्कृत गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा सोमवारी (दि. १३) संस्थेचे स्फूर्तिस्थान स्व. चांगू काना ठाकूर यांच्या पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून झाला.





कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भूषविले. यावेळी प्रभारी अधिष्ठाता डॉ. कविता लघाटे बोलत होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य आमदार प्रशांत ठाकूर, नगरसेवक परेश ठाकूर, एकनाथ गायकवाड, नगरसेविका सीताताई पाटील, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ.एस.टी. गडदे, सदस्य ॲड. राहुल घरत, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी सरपंच भाऊशेठ पाटील, महात्मा फुले कॉलेजचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, आदेश ठाकूर आदी उपस्थित होते.

यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात शिक्षणाचा वसा आणि संस्कारांचा वारसा जपत समाजातील इतर घटकांनाही सोबत घेऊन पुढे जाण्याची वृत्ती, आपल्या यशाचा आनंद इतरांसोबत वाटण्याची कला विद्यार्थ्यांनी जोपासली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली. आदरणीय चांगू काना ठाकूर यांच्या संघर्षमय आणि मूल्याधिष्ठित जीवनातून प्रेरणा घेऊन प्रत्येक विद्यार्थ्याने स्वकीर्ती रूपाने आदर्श समाजासमोर निर्माण करावा; त्याचबरोबर देशाभिमान, सामाजिक उत्तरदायित्व आणि कठोर परिश्रम यांच्या बळावरच उत्तुंग यश प्राप्त करावे, असे सांगितले.

आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) वाढत्या प्रभावामुळे करिअरच्या नव्या संधी आणि आव्हानांचा विद्यार्थ्यांनी अभ्यास करणे गरजेचे आहे. केवळ पदवी मिळवून न थांबता व्यावसायिक कौशल्ये आत्मसात केली, तर पनवेल तालुक्याच्या वेगवान विकासामुळे येत्या पाच वर्षांत निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या असंख्य संधींचा लाभ युवकांना घेता येईल. त्यासाठी युवकांनी सजग राहिले पाहिजे.

प्राचार्य डॉ.एस.के. पाटील यांनी महाविद्यालयाच्या आजपर्यंतच्या प्रगतीचा आढावा सादर केला, तर पाहुण्यांची ओळख अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव यांनी करून दिली. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतामध्ये महाविद्यालयातील सर्वोत्तम पायाभूत सुविधा, सुसज्ज डिजिटल ग्रंथालय, अद्ययावत प्रयोगशाळा, सकारात्मक शैक्षणिक वातावरण, सर्वांगीण विकासासाठी प्रोत्साहन देणारे व्यवस्थापन व प्राध्यापकवृंद याबाबत कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्रक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विद्यार्थी परिषद व विद्यार्थी कल्याण कक्षाचे चेअरमन डॉ.एस.एन. परकाळे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.बी.डी. आघाव व महिला विकास कक्षाच्या चेअरमन डॉ. आर.डी.म्हात्रे यांनी परिश्रम घेतले. डॉ.आर.व्ही. येवले, डॉ.जी.एस. तन्वर, प्रा.ए.व्ही. पाटील व प्रा.एन.एच. कडू यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर उपस्थितांचे आभार डॉ. एस.एन. परकाळे यांनी मानले.

# रायगडात २२ जुलै रोजी महाराजस्व समाधान शिबिर

## आमदार प्रमोद जठार यांची माहिती

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यातील नागरिकांचे महसूलविषयक प्रश्न जलद, सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने निकाली काढण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर हा उपक्रम राबविण्यात येत आहे. २२ ते २९ जुलै या कालावधीत हे शिबिर संपूर्ण राज्यात राबविण्यात येत असून २२ जुलैला एकाच दिवशी रायगड जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघांमध्ये होणार असल्याची माहिती या अभियानाचे सदस्य आमदार प्रमोद जठार यांनी दिली.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरासंदर्भात रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक सोमवारी (दि. १३) आयोजित करण्यात आली होती. जिल्हाधिकारी किशन जावळे तसेच



महसूल विभागाचे अन्य अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत आमदार प्रमोद जठार यांनी सविस्तर माहिती दिली. रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष चित्रा पाटील आदी यावेळी उपस्थित होते.

महसूल विभागातील जनतेशी निगडित विविध प्रकरणे, प्रलंबित प्रश्न एकाच छताखाली छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरांचे आयोजन करून तातडीने मार्गी लावणे हा या अभियानाचा उद्देश आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री तथा अभियानाचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून संपूर्ण राज्यभर शिबिरे घेण्यात येणार आहेत.

कै. उपमुख्यमंत्री अजित पवार यांची २२ जुलै रोजी जयंती आहे, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवसही २२ जुलै रोजीच आहे. यानिमित्ताने राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यातील महसूल मंडळात २२ ते २९ जुलै या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान सप्ताह आयोजित करण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यात २२ जुलै रोजी एकाच दिवशी हे अभियान राबविण्यात येणार आहे, अशी माहिती आमदार जठार यांनी यावेळी दिली तसेच जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी शिबिरात सहभागी होऊन महसूल विभागातील आपले प्रश्न, दाखले त्वरित मार्गी लावून उपलब्ध करून घ्यावेत, असे आवाहन केले.

## मान्सूनसाठी पुन्हा प्रतीक्षा

**मुंबई :** मागील काही दिवसांपासून राज्यातील बहुतांश भागात पावसाने विश्रांती घेतल्याने उष्ण, दमट आणि कोरडे हवामान अनुभवायला मिळत आहे. जुलै महिन्याच्या सुरुवातीला राज्यभर मुसळधार पावसाने हजेरी लावली होती, मात्र सध्या मान्सूनची तीव्रता कमी झाली आहे. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने १८ ते २५ जुलैदरम्यान मान्सून पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

हवामान विभागाच्या रिपोर्टनुसार सध्याची परिस्थिती केवळ एल निनोचा परिणाम आहे, असे ठामपणे सांगता येणार नाही, पण अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यास चक्रीय परिस्थिती तयार होऊन मान्सूनला पुन्हा चालना मिळू शकते.

# देवकुंड धबधब्यात बुडालेल्या दोन्ही पर्यटकांचे मृतदेह सापडले

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील भिरा येथील देवकुंड धबधब्यात बुडालेल्या दोन्ही तरुणांचे मृतदेह २४ तासांच्या शोधमोहिमेनंतर अखेर रेस्क्यू टीमला सापडले. विष्णू विलास ढोक (वय अंदाजे २२, रा. हिंगोली) आणि गोपाल रामलाल राठोड (वय अंदाजे २३, रा. नांदेड) अशी मृतांची नावे असून हे दोघेही चाकण (पुणे) येथील कंपनीत कामाला होते.

बंदी असूनही आपल्या २० मित्रांसोबत विष्णू व गोपाल रविवारी देवकुंड धबधब्यावर फिरायला गेले होते. प्राथमिक माहितीनुसार या पर्यटकांना सुरुवातीला पोलिसांनी परत जाण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर त्यांनी कथितपणे म्हसेवाडी परिसरातील चोरवाटेने देवकुंड गाठल्याची चर्चा सुरू आहे.

दोन पर्यटक पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्यानंतर स्थानिक स्वयंसेवक, शेलारमामा रेस्क्यू टीम, एसव्हीआरएसएस पथक, पोलीस आणि स्वयंसेवक यांनी तत्काळ शोधमोहीम राबविली, मात्र सायंकाळी काळोख पसरल्यानंतर शोध थांबवण्यात आला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा ही शोधमोहीम तीव्र करण्यात आली. अखेर दुपारी या दोन्ही पर्यटकांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले.

# शहरांच्या सर्वांगीण विकासासाठी अर्बन चॅलेंज फंड निर्माण करावा -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

शहरी विकासात सृजनशील बदल घडवून आणण्यासाठी शहरांना विकासाचे केंद्र मानून त्यांच्या प्रगतीतील अडथळे दूर करण्यासाठी अर्बन चॅलेंज फंडच्या माध्यमातून विकास करण्यात यावा. शहरांच्या सर्जनशील विकासासाठी या अभिनव अभियानामुळे नागरी पायाभूत सुविधा आणि सेवा वितरणात लक्षणीय सुधारणा होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली 'वर्षा' निवासस्थानी नगर विकास विभागाच्या आढावा बैठकीत अर्बन चॅलेंज फंड अभियानाच्या आराखड्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, वित्त व नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करताना महाराष्ट्राने या दृष्टीने पावले टाकली असून यापूर्वी नाशिक आणि पुणे महानगरपालिकेत या धर्तीवर निधी उभारणी करून पाणी पुरवठा व स्वच्छता यासाठी निधी उभारले आहेत. या महानगरपालिकांच्या निधी उभारणीसाठी राष्ट्रीय सर्वोच्च समितीची (एनएसी) मंजुरी देखील मिळाली आहे तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि नागपूर महानगरपालिका येथील काही प्रकल्पांना या पद्धतीने निधी उपलब्ध होणार आहे असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

कर्ज रोखे आणि खासगी सार्वजनिक भागीदारीतून निधी उभारणी शक्य, यावेळी केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानाधारित शहरी योजनांसोबत शहरांच्या संस्थात्मक, आर्थिक व प्रशासकीय मर्यादांमुळे पायाभूत प्रकल्पांच्या अंमलबजावणीत येणारे अडथळे दूर करण्यासाठी अर्बन चॅलेंज फंड महत्त्वपूर्ण ठरेल, यासाठी कर्ज रोखे आणि खासगी सार्वजनिक भागीदारीतून निधी उभारणी करणे शक्य होईल असे नमूद करण्यात आले.

या अभियानांतर्गत सुमारे २२ प्रमुख घटकांचा समावेश करण्यात येणार असून त्यामध्ये डिजिटल प्रशासन, मुख्य नागरी पायाभूत सुविधांचा विकास, चक्रीय अर्थव्यवस्था (Circularity), वाहतूक कोंडी कमी करणारे प्रकल्प, शेवटच्या टप्प्यातील जोडणी, ५ ते २० चौ.कि.मी. क्षेत्रातील शहर भागांचे पुनरुज्जीवन, लहान व मध्यम शहरे हे विकासाची केंद्र, परपेठांचे पुनर्विकास, पायी चालणारे व सायकलस्नेही वाहतूक प्रकल्प, निदर्शक (Demonstration) प्रकल्प, ट्रान्झिट हब उन्नतीकरण, ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट पायाभूत सुविधा विकास, शहर-विकास केंद्र, शहरांचे सृजनशील पुनर्विकास तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता प्रकल्पांचा समावेश आहे.

अर्बन चॅलेंज फंडासाठीच्या वित्तीय आकृतीबंधाबाबत चर्चा करण्यात आली. अभियानात ₹९० हजार कोटींचा प्रकल्प निधी प्रस्तावित आहे. महाराष्ट्रासाठी केंद्र शासनाचा ₹११,२०० कोटी, राज्य शासनाचा ₹११,२०० कोटी आणि बाजाराधारित स्रोतांतून ₹२२,४०० कोटी असा एकूण ₹४४,८०० कोटींच्या प्रकल्पांना चालना मिळू शकते,

# रायगड जिल्ह्यात आठ हजार ९१४ शेतकऱ्यांना कर्जमाफी

**अलिबाग : प्रतिनिधी**

नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरूपी दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' योजना जाहीर केली आहे. या योजने अंतर्गत रायगड जिल्ह्यातील ८ हजार ९१४ शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. जिल्ह्यातील सर्व पात्र कर्ज खात्यांची तपासणी पूर्ण करून त्यांची माहिती शासनाच्या कर्जमाफी पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा उपनिबंधक तनवीर पाटील यांनी दिली.



या योजनेअंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीक कर्ज थकीत असलेल्या आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत कर्जाची परतफेड न करू शकलेल्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात येणार आहे. तसेच, कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचीही तरतूद करण्यात आली आहे. राष्ट्रीयीकृत बँका, खाजगी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तसेच प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांकडून घेतलेल्या कर्जालाही या योजनेचा लाभ लागू होणार असल्याने शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे.

पात्र लाभार्थ्यांच्या याद्या प्राप्त होताच त्या सेवा संस्था, ग्रामपंचायत, बँक शाखा, सहायक निबंधक आणि जिल्हा उपनिबंधक कार्यालयांमध्ये प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. त्यानंतर पात्र शेतकऱ्यांनी 'आपले सरकार' सेवा केंद्र किंवा संबंधित बँक शाखेत जाऊन आधार प्रमाणीकरण पूर्ण करणे आवश्यक असून, प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कर्जमाफीची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे.

# गुळसुंदेत उद्या मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ओटिकर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत तसेच स्फेरुल फाउंडेशन आणि ग्रामपंचायत गुळसुंदे यांच्या संयुक्त विद्यमाने गुळसुंदे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील गुळसुंदे, लाडीवली, आकुळवाडी, आदिवासी वाड्या तसेच परिसरातील सर्व ग्रामस्थांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



हे शिबिर बुधवारी (दि. १५) सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत गुळसुंदे समाज मंदिर येथे आयोजित करण्यात आले आहे. शिबिरामध्ये रक्त तपासणी, ईसीजी, रक्तदाब तपासणी, सर्वसाधारण आरोग्य तपासणी तसेच पोषणविषयक समुपदेशन या सुविधा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत आरोग्य तपासणी, वैद्यकीय सल्ला आणि पोषणविषयक मार्गदर्शनही दिले जाणार आहे. गुळसुंदे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील सर्व नागरिकांनी या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रामपंचायत गुळसुंदे व आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानातून रायगड जिल्ह्यात महसूल विभागाच्या सेवा नागरिकांच्या दारी!

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या लोककल्याणकारी, न्यायनिष्ठ आणि जनहितैषी कार्यातून प्रेरणा घेत महाराष्ट्र शासनाने महसूल विभागातील प्रलंबित प्रश्नांचा जलद व पारदर्शक निपटारा करण्यासाठी "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान" हाती घेतले आहे. रायगड जिल्ह्यात हे अभियान दि. २२ जुलै ते २९ जुलै २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार असून नागरिकांना महसूल विभागाच्या विविध सेवा त्यांच्या गावाजवळच उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

महसूल मंत्री तथा छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचे अध्यक्ष चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली हे अभियान राबविण्यात येत आहे. लोकनेते अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त जनतेच्या प्रश्नांचा तात्काळ निपटारा करण्याचा संकल्प तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त लोकाभिमुख प्रशासनाची संकल्पना अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने राज्यभर हे जयंती सप्ताह शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

या अभियानांतर्गत महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा, ७/१२ उतारे व विविध दाखल्यांचे वितरण, वारस नोंद, फेरफार, नाव दुरुस्ती, जमिनीचे वर्ग बदल, पीक पाहणी, नैसर्गिक आपत्ती पंचनामे, पीक कर्जमाफीसंदर्भातील प्रकरणे, डिजीटल स्वाक्षरीचे ७/१२, जात, उत्पन्न, रहिवासी, नॉन-क्रिमिलिअर, विद्यार्थी दाखले, जमीन मोजणीसाठी अर्ज, अकृषिक (NA) मार्गदर्शन, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या वंचित नागरिकांना योजनांची माहिती आदी सेवा शिबिरांमधून



उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

याशिवाय शेतकऱ्यांसाठी शेतरस्ते, बांधबंदिस्ती, जमीन मोजणी, सर्व्हे प्रकरणे, नैसर्गिक आपत्तीमधील नुकसानभरपाई, तसेच विविध महसुली योजनांबाबत मार्गदर्शन करून पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.

रायगड जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी आपल्या तालुक्यात आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरांमध्ये सहभागी होऊन महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्नांचा तातडीने निपटारा करून घ्यावा, असे आवाहन अभियानाचे प्रभारी जिल्हाधिकारी प्रमोद जठार यांनी केले आहे. तसेच इलेक्ट्रॉनिक, प्रिंट, सोशल मीडिया आणि इतर माध्यमांनी या लोकाभिमुख उपक्रमाला व्यापक प्रसिद्धी द्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

जिल्हा प्रशासनाकडून दि.२२ जुलै २०२६ रोजी प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील सार्वजनिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून त्याची माहिती पुढीलप्रमाणे आहे. १८८ पनवेल विधानसभा मतदार संघ येथे व्ही.के.हायस्कूल पनवेल. १८९ कर्जत विधानसभा मतदार संघ येथे महाराजा मंगल कार्यालय, खोपोली, ता.खालापूर. १९० उरण विधानसभा मतदार संघ येथे एकविरा मंगल कार्यालय, कोप्रोली, ता.उरण. १९१ पेण विधानसभा मतदार संघ येथे मराठा समाज हॉल, आंबेघर, ता.पेण. १९२ अलिबाग विधानसभा मतदार संघ येथे आर.सी.एफ.कॉलनी कुरुळ,ता.अलिबाग. १९३ श्रीवर्धन विधानसभा मतदार संघ येथे ज.गांधी मेमोरियल हॉल माणगाव माणगाव-निजामपूर रोड, ता.माणगाव. १९४ महाड विधानसभा मतदार संघ येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाड ता.महाड.

# श्री द्वारकाधीश ट्रस्टतर्फे शैक्षणिक साहित्याचे विद्यार्थ्यांना वाटप



**पनवेल : वार्ताहर**

श्री द्वारकाधीश चॅरिटीज ट्रस्टच्या वतीने तारा येथील अर्चना ट्रस्ट आणि बानूबेन प्रवीण शहा येथील वसतिगृहात शिकत असलेल्या किमान २२५ आदिवासी विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष अजित कारखानीस यांनी मुलांना मार्गदर्शन करताना खूप छान अभ्यास करा, मोठे व्हा आणि आपल्या आईवडिलांना सांभाळा, समाजाला मदत करा, असे सांगितले.

कार्यक्रमाला सौ. कारखानीस डॉ. मयुरेश पिंपुटकर, शमिका पिंपुटकर, दिगंबर गोगटे, संस्थेचे समन्वयक योगेश ताटे, अर्चना ट्रस्टचे सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर घरत, संजय म्हात्रे, निलेश पाटील आणि आदिवासी विद्यार्थी उपस्थित होते.

# 'शिक्षक घडले तरच विद्यार्थी घडतील'

## सेवानिवृत्त शिक्षकांचा पंचायत समितीत सन्मान

**नेरळ : प्रतिनिधी**

शिक्षक घडले तरच विद्यार्थी घडतील आणि विद्यार्थ्यांमधूनच सक्षम समाज उभा राहील या भावनेतून कर्जत पंचायत समितीच्या सभापती नमिता घारे यांच्या पुढाकाराने चालू वर्षात सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांचा सन्मान सोहळा सोमवारी पंचायत समितीच्या सभागृहात पार पडला. या वेळी २२ सेवानिवृत्त शिक्षकांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच नव्याने नियुक्त झालेल्या १२ केंद्रप्रमुखांचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात सेवानिवृत्त शिक्षकांनी या उपक्रमाचे स्वागत केले. शिक्षक मो. हुसेन नासिर पटेल यांनी मनोगत व्यक्त करताना, अनेक वर्षांनंतर शिक्षकांचा सन्मान करण्याची परंपरा पुन्हा सुरू केल्याबद्दल सभापती नमिता घारे यांचे आभार मानले.

सभापती नमिता घारे यांनी शिक्षक हे समाजाचे खरे शिल्पकार असल्याचे सांगत, शिक्षकांचा सन्मान करणे हे समाजाचे कर्तव्य असल्याचे नमूद केले. दरवर्षी सेवानिवृत्त शिक्षकांचा सन्मान सोहळा आयोजित करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.





**उरण :** रयत शिक्षण संस्थेचे आधारस्तंभ माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त कर्मवीर भाऊराव पाटील माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय पिरकोन येथे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप तसेच इयत्ता दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे चेअरमन व माजी राजिप सदस्य जीवन गावंड, उरण भाजपचे उपाध्यक्ष मुकुंद गावंड, कामगार नेते जितेंद्र घरत, ग्रामपंचायत सदस्य संग्राम पाटील, दहागाव माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष अनिल पाटील, अक्षय ठाकूर व प्रा. ए.डी. पाटील, प्रमोद म्हात्रे आदी उपस्थित होते.

# डोकेदुखीवर शस्त्रक्रिया टाळत 'एपिड्युरल ब्लड पॅच' प्रक्रियेने रुग्णावर यशस्वी उपचार

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महिनाभर सतत डोकेदुखीचा त्रास होत असलेल्या ५० वर्षीय रुग्णाचे खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटल येथे दुर्मीळ आजाराचे अचूक निदान करत यशस्वी उपचार करण्यात आले. न्यूरोलॉजी तज्ज्ञांनी शस्त्रक्रिया टाळून एपिड्युरल ब्लड पॅच प्रक्रियेने रुग्णावर उपचार केले.



तळोजा येथे राहणाऱ्या ५० वर्षीय मनोज गुप्ता या रुग्णाला तीव्र डोकेदुखीचा त्रास सतावत होता. मेंदूच्या स्कॅनमध्ये सबड्युरल हेमॅटोमा दिसल्याने शस्त्रक्रियेचा सल्ला देण्यात आला होता, मात्र तज्ज्ञ डॉक्टरांनी रक्तसंचय डोकेदुखीचे मूळ कारण नसून स्पायनल कॉर्डमधून सेरेब्रोस्पाइनल फ्लुइड गळती झाल्यामुळे मेंदूवर पडणाऱ्या ताणामुळे तो निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले. पुढील तपासणीत ही गळती मानेजवळील (सर्व्हायकल स्पाईन) भागातून होत असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर न्यूरोलॉजिस्ट डॉ. पवन ओझा आणि डॉ. सुरंजना बसाक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

उपचारानंतर काही तासांतच रुग्णाची डोकेदुखी लक्षणीयरीत्या कमी झाली. डॉ. पवन ओझा (न्यूरोलॉजिस्ट, मेडिकव्हर हॉस्पिटल, खारघर) म्हणाले, उभे राहिल्यावर वाढणारी आणि झोपल्यावर कमी होणारी डोकेदुखी ही साधी मायग्रेन किंवा ताणामुळे होणारी डोकेदुखी असेलच असे नाही. अशा लक्षणांमागे स्पॉन्टेनियस इंट्राक्रॅनियल हायपोटेन्शन किंवा सेरेब्रोस्पाइनल फ्लुइड झिरपण्यासारखे दुर्मीळ कारण असू शकते. वेळीच निदान आणि योग्य उपचार केल्यास रुग्ण पूर्णपणे बरा होऊ शकतो. मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे सेंटर हेड संदीप जोशी म्हणाले, मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक निदान सुविधा आणि तज्ज्ञांच्या समन्वयातून रुग्णांना उत्तमोत्तम उपचार पुरविले जातात आणि हे प्रकरण याचे एक उदाहरण ठरले आहे.

पान १ वरुन

# पनवेलजवळील आदई डोंगरावर वृक्षारोपण अभियान

यावेळी पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे रोप भेट देऊन स्वागत केले. कार्यक्रमास अरुण रोकडे, लक्ष्मण तळेकर, उत्तम ढेबे, डॉ. कृष्णा देसाई, किसन बोराटे, नागेश हिरवे, अतुल पोतदार, माजी सरपंच महादू शेळके, मंगेश भोपी, राजेश काकडे, नितीन वाघमारे, विजय हातिसकर, अविनाश मिंड, जनार्दन पाटील, श्रीचंद भंडारी, रोहित पाटील, किरण शेळके, विलास शेळके, ज्ञानेश्वर पाटील, सूरज म्हात्रे यांच्यासह शेकडो पर्यावरणप्रेमी व कार्यकर्ते उपस्थित होते. या पर्यावरण संवर्धन उपक्रमात पनवेल ट्रॅकर्स, आदई हिल हिरवाई ग्रुप, आदई हिल वृक्षारोपण व संगोपन ग्रुप, पनवेल आगरी-कोळी डॉक्टर्स असोसिएशन, संवेदना चॅरिटेबल ट्रस्ट तसेच आदई ग्रामस्थ मंडळ आणि भजनी मंडळ यांचे सहकार्य लाभत आहे.



# सीकेटी विद्यालय 'आयएसओ' प्रमाणित

## गुणवत्ता आणि उत्कृष्टतेची पोचपावती







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय इंग्रजी माध्यम प्राथमिक विभाग अधिकृतपणे आयएसओ प्रमाणित शाळा म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे. शिक्षणातील गुणवत्ता, उत्कृष्टता आणि सातत्यपूर्ण प्रगतीच्या दिशेने विद्यालयाने हे मानाचे पाऊल टाकले आहे.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर आणि वर्षा ठाकूर यांनी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यालयाला मिळालेले हे यश मुख्याध्यापिका शिंदे यांचे कुशल नेतृत्व, प्रभावी मार्गदर्शन आणि संपूर्ण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फळ आहे. या प्रवासात विद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि हितचिंतकांचे अथक परिश्रम, समर्पण आणि मोलाचे सहकार्य लाभले. सर्वांच्या एकत्रित व प्रामाणिक प्रयत्नांमुळेच शाळेला हा मानाचा टप्पा गाठता आला असून विद्यालयावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# तोतया पोलिसांनी महिलेला गंडवले

## चार लाख ८० हजारांचे दागिने लुबाडून पसार

**पनवेल : वार्ताहर**

पोलीस असल्याची बतावणी करून दोन तोतया पोलिसांनी एका महिलेचे तब्बल चार लाख ८० हजारांचे दागिने लुबाडून पलायन केल्याची घटना खांदा कॉलनी, सेक्टर-९ मध्ये घडली. याप्रकरणी खांदेश्वर पोलिसांनी अज्ञात तोतया पोलिसांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

या घटनेतील तक्रारदार महिला खांदा कॉलनीमध्ये राहण्यास असून खांदा कॉलनी, सेक्टर ९ मधील खांदेश्वर सोसायटी परिसरातून पायी जात होत्या. यावेळी काळ्या रंगाच्या दुचाकीवरून आलेल्या दोन व्यक्तींनी त्यांना अडवले. त्यांनी स्वतः पोलीस अधिकारी असल्याचे भासवून महिलेला घाबरवले. पुढे गडबड झाल्याचे सांगून महिलेला अंगावरील दागिने काढून सुरक्षित ठेवण्यास सांगितले. त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून महिलेने आपल्या अंगावरील चार लाख ८० हजारांचे दागिने काढले. यावेळी एकाने दागिने व्यवस्थित बांधून देण्याचा बहाणा करून ते आपल्याकडे घेतले. हातचलाखीने त्यांनी सर्व दागिने स्वतःजवळ ठेवले आणि महिलेला रिकामा कागदाचा पुडा देऊन दोघेही दुचाकीवरून पळून गेले.

# पिरकोनमध्ये अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

उरण तालुक्यातील पिरकोन परिसरात अज्ञात वाहनाच्या धडकेत एका दुचाकीस्वाराचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञात वाहनचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून आता अधिक तपास सुरू आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मृणाल मनोहर जोशी आपल्या (२७, रा. टाकीवाडा, ता. उरण, जि. रायगड) हे एमएच ४६ डी ०५८८ क्रमांकाच्या प्लेझर दुचाकीवरून प्रवास करत होते. पिरकोन येथील साई सहारा हॉटेलसमोरील रस्त्यावर अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात मृणाल मनोहर जोशी गंभीर जखमी झाले. दरम्यान, अपघातानंतर संबंधित वाहनचालकाने मदत न करता घटनास्थळावरून पलायन केल्याचा आरोप आहे.

जखमी अवस्थेत मृणाल मनोहर जोशी यांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी अज्ञात वाहनचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

# एमएनएम विद्यालयात स्व. चांगू काना ठाकूर यांचे पुण्यस्मरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**




जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एम.एन.एम. विद्यालयात व टी.एन.जी. कनिष्ठ विज्ञान विद्यालयात स्वर्गीय चांगू काना ठाकूर यांच्या २४व्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी चांगू काना ठाकूर यांच्या जीवनकार्याचा आढावा घेण्यात आला. त्यांचे जीवन अत्यंत साधे, सरळ व मूल्यनिष्ठ होते. समाजसेवा, शिक्षण आणि संस्कार यांना त्यांनी आपल्या आयुष्यात सर्वोच्च स्थान दिले. ते माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे वडील होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांना घडविण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. त्यांच्या कष्टाळू वृत्ती, प्रामाणिकपणा, साधेपणा आणि दूरदृष्टीमुळेच समाजाला एक सक्षम व लोकाभिमुख नेतृत्व लाभले, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या आदर्श जीवनातून प्रेरणा घेऊन प्रामाणिकपणा, मेहनत आणि समाजसेवेची भावना जोपासण्याचा संकल्प केला. कार्यक्रमास शाळेचे चेअरमन भार्गव ठाकूर, माजी उपसरपंच विजय घरत, ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर, कमलाकर देशमुख, मीनाक्षी पाटील, जयवंत देशमुख, रघुनाथ देशमुख, श्रीकांत घरत तसेच विद्यालयाच्या प्राचार्या सायली वडवलकर, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी चांगू काना ठाकूर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात जागतिक लोकसंख्या दिन साजरा; विविध उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात शनिवारी (दि. ११) जागतिक लोकसंख्या दिनाचे औचित्य साधून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सांस्कृतिक कमिटीच्या वतीने पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेसाठी 'लोकसंख्या आणि शाश्वत विकास', 'उत्तम भविष्यासाठी लोकसंख्येचा समतोल' आणि 'सशक्त नागरिक आणि सुरक्षित पृथ्वी' विषयांवर विद्यार्थ्यांनी सर्जनशील व अर्थपूर्ण माहिती देणारे पोस्टर्स बनविले होते.

आपल्या कलाकृतीतून विद्यार्थ्यांनी वाढती लोकसंख्या, पर्यावरण संवर्धन, संसाधनांचा योग्य वापर व शाश्वत विकासाचे महत्त्व प्रभावीपणे मांडले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांमध्ये लोकसंख्याविषयक समस्यांबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी व सर्जनशील विचारांना प्रोत्साहन देण्यासाठी 'घोषवाक्य' लेखन उपक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचे आयोजन Language Club यांच्या वतीने करण्यात आले होते. जागतिक लोकसंख्या दिन विषयावर विद्यार्थ्यांनी सर्जनशील आशयपूर्ण आणि प्रभावी घोषवाक्ये सादर केली.

लोकसंख्या वाढ, शाश्वत विकास, संसाधनांचा सुयोग्य वापर व जबाबदार नागरिकत्व यांसारख्या विषयांवर विद्यार्थ्यांनी प्रभावी संदेश दिला. यामुळे विद्यार्थ्यांत प्रभावी अभिव्यक्ती कौशल्यांचा विकास होण्यास मदत होते. उपक्रमांसाठी प्राचार्या निशा नायर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, ज. भ. शि. प्र. संस्था बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, सचिव डॉ. गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी यांनी अभिनंदन करून कौतुक केले.

## निवडक

### वॉचमनकडून दागिने, गाडीची चोरी

**नवीन पनवेल :** खारघर येथे इमारतीच्या सिक्युरिटीसाठी नेमलेल्या वॉचमनने घरात प्रवेश करून सोन्याच्या अंगठ्या, इतर ऐवज आणि खाली पार्क केलेली दुचाकी गाडी चोरून नेली. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात वॉचमनविरोधात १२ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. करण केशव कडू हे साईसृष्टी बिल्डिंग, रांजणपाडा येथे राहत असून ३२ वर्षीय वॉचमनने त्यांच्या घराचा कडीकोयंडा आणि कुलूप तोडून घरात प्रवेश करून सोन्याच्या अंगठ्या, इतर ऐवज आणि गाडी चोरून नेली.

### एटीएम बदलून केली फसवणूक

**नवीन पनवेल :** हातचलाखी करून एटीएम बदली केले आणि ५८ हजार रुपये काढून आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात १२ जुलै रोजी अनोळखी इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुरेशचंद जैन हे ज्येष्ठ नागरिक राजस्थान येथे राहत असून ते १० जुलै रोजी खारघर येथील बँकेच्या एटीएममध्ये गेले होते. यावेळी एका अनोळखी इसमाने हातचलाखी करून एटीएम बदली केले आणि त्याद्वारे ५८ हजार रुपये काढून त्यांची फसवणूक केली.

### 'यूईएस'च्या वर्धापनदिनी कार्यक्रम

**उरण :** यूईएस शाळेच्या ४८व्या वर्धापन दिनानिमित्त नुकतेच श्री सत्यनारायण पूजेचे आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या वर्धापन दिनानिमित्त यूईएस स्कूल आणि ज्यु. कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर आणि वक्तृत्व स्पर्धेचे आयोजनही करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये ज्युनिअर कॉलेज, माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेऊन स्पर्धेचा आनंद लुटला. अशा रीतीने मोठ्या उत्साहात यूईएस शाळेचा ४८वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला.



# 'एचपीसीएल'तर्फे स्वच्छता पंधरवडा; विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप

**पनवेल : वार्ताहर**



हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने रायगड जिल्हा परिषद शाळा, चावणे येथे 'स्वच्छता पंधरवडा' मोहीम मोठ्या उत्साहात राबविण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची सवय रुजवणे आणि पर्यावरणाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने रायगड जिल्हा परिषद शाळा, चावणे येथे 'स्वच्छता पंधरवडा' ही विशेष मोहीम अत्यंत उत्साहात राबविण्यात आली.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश शालेय विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती निर्माण करणे आणि त्यांना चांगल्या सवयींची ओळख करून देणे हा होता. या कार्यक्रमाला एचपीसीएलचे मॅनेजर मरुला स्वामी आणि एचपीसीएलचे सुपरवायझर प्रवीण लबडे प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच चावणे शाळेच्या मुख्याध्यापिका सुलभा तायडे व इतर शिक्षिका उपस्थित होत्या. मान्यवरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले व त्यांना मार्गदर्शन केले. या मोहिमेंतर्गत विद्यार्थ्यांच्या दैनंदिन गरजा आणि पावसाळ्याचे दिवस लक्षात घेऊन उपयुक्त वस्तूंचे वाटप करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना पेन्सिल किट, छत्री आणि स्केचपेन यांचे वाटप करण्यात आले.

शाळेचा परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी एचपीसीएलतर्फे शाळेला डस्टबिन, झाडू यांसारखे स्वच्छता साहित्य भेट देण्यात आले. केवळ साहित्याचे वाटप न करता मुलांमध्ये स्वच्छतेचे महत्त्व रुजवण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी स्वच्छतेच्या विषयावर अतिशय सुंदर आणि संदेशात्मक चित्रे काढली. तसेच मुलांनी स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणारे अभ्यासपूर्ण निबंधदेखील लिहिले.

# पनवेलच्या सिद्धांत कांबळेची आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप

## स्कॉटलंडचा पात्र सॉलिसिटर होण्याचा बहुमान

**पनवेल : वार्ताहर**



पनवेलमध्ये राहणाऱ्या सिद्धांत संजय कांबळे या विद्यार्थ्याने स्कॉटलंडमधील अत्यंत प्रतिष्ठेची मानली जाणारी क्वालिफाईड लॉयर्स असेसमेंट परीक्षा उत्तीर्ण करून स्कॉटलंडचे पात्र सॉलिसिटर होण्याचा मान मिळवला आहे. त्याच्या या यशामुळे पनवेल शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. लॉ सोसायटी ऑफ स्कॉटलंड यांनी मे २०२६ मध्ये झालेल्या परीक्षेचा निकाल जाहीर केला. त्यात सिद्धांत यांनी सर्व विषय यशस्वीरित्या उत्तीर्ण केल्याची अधिकृत पुष्टी केली आहे.

गुन्हेगारी कायदा, सार्वजनिक कायदा, युरोपियन कायदा, पुरावे, प्रक्रिया, व्यावसायिक आचारसंहिता, कन्व्हेअन्सिंग, अकाउंट्स रूल्स आदी सर्व विषयांमध्ये त्यांनी यश मिळवले आहे. स्कॉटलंडमधील ही परीक्षा अत्यंत कठीण आणि दर्जेदार मानली जाते. अथक परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्दीच्या बळावर सिद्धांत यांनी हे यश मिळवले आहे. सिद्धांत यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल पनवेल परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार आणि हितचिंतकांनी आनंद व्यक्त केला आहे.

# झुलेलाल मंदिरातील रक्तदान शिबिराला प्रतिसाद : १४९ जणांनी दिले योगदान

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त, वार्ताहर**

थॅलेसेमियाग्रस्त रुग्णांच्या मदतीसाठी पूज्य सिंधी पंचायत झुलेलाल मंदिरात आयोजित रक्तदान शिबिराला रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रविवारी (दि. १२) झालेल्या या शिबिरात १४९ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला. श्री प्रल्हादराव झुलेलाल ट्रस्ट, आम्ही रक्तदाते पनवेलचे, पूज्य सिंधी पंचायत, पनवेल रिक्षा विद्यार्थी वाहक संस्था, पनवेल तालुका पत्रकार विकास मंच, पनवेल-नवी मुंबई पत्रकार संघ, विश्व सिंधी सेवा संगम आणि एमजीएम रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने हे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन नियमित रक्तदाते राकेश पाटील, मनीष यशवंतराव आणि राजेंद्र गुरंबे यांच्या हस्ते झाले. या रक्तदान शिबिराच्या उपक्रमाचे आरटीओ अधिकारी राजेश



झेंडेकर यांनी कौतुक केले. त्यांनी पुढील रक्तदान शिबिरात उत्स्फूर्तपणे सहभागी होणार असल्याचे जाहीर केले. तसेच अवयवदान उपक्रमात त्यांनी स्वतः अवयवदान करण्याची शपथ घेतली. पूज्य सिंधी पंचायतचे किशन तलरेजा, दौलत सचदेव, दिलीप जैस्वानी, चंदर देवानी, महेश तनवाणी, भागचंद खुबचंदानी आणि सनी गिडवानी यांनी शिबिराला भेट दिली.

रक्तदान शिबिर यशस्वी करण्याकरिता ॲड. मनोहर सचदेव, ॲड. अमोल साखरे, साक्षी सचदेव, पांडुरंग हुमणे, किसन रौंदळ, मुरलीधर ढाके, संगीता साखरे, उज्वला व सचिन भिसे, प्रभाकर म्हात्रे, बन्सीलाल तळेकर, राजेश भगत व सर्व संघटनेच्या कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली. संस्थेतर्फे पुढील रक्तदान शिबिर ११ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले.


## संपादकीय

# काँग्रेसचे जुनेच राजकारण

एखाद्या विषयाची चौकशी व्हावी, त्यात पारदर्शकता राखली जावी अशी मागणी करणे योग्य आहे. परंतु कोणतेही ठोस निष्कर्ष समोर येण्यापूर्वीच निव्वळ राजकारण करत अकारण संशयाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याने श्रद्धाळूंच्या भावना दुखावल्या जातात आणि समाजात अनावश्यक संभ्रम निर्माण होतो.

**अयोध्येतील श्रीराम मंदिर हा भारताच्या सांस्कृतिक अस्मितेशी आणि कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेशी जोडलेला प्रश्न आहे. अनेक दशकांच्या संघर्षानंतर आणि सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निर्णयानंतर तेथे आजचे भव्य राम मंदिर उभे राहिले आहे. देशभरातील नागरिकांनी या घटनेकडे राष्ट्रीय अभिमानाचा क्षण म्हणून पाहिले. हा केवळ एक धार्मिक विषय कधीच नव्हता. राम मंदिराच्या उभारणीच्या संपूर्ण इतिहासाकडे पाहिले तर काँग्रेसची भूमिका सातत्याने संदिग्ध राहिलेली दिसते. स्वातंत्र्यानंतर अनेक दशके हा प्रश्न प्रलंबित राहिला. हिंदू समाजाच्या भावना लक्षात घेऊन तोडगा काढण्याऐवजी हा विषय न्यायालये आणि प्रशासकीय प्रक्रियांमध्ये अडकून राहिला. परंतु आज मंदिराशी संबंधित कोणताही वाद किंवा आरोप समोर आले की काँग्रेस पक्ष आणि संबंधित आघाडीतील सहयोगी पक्ष त्यात निव्वळ राजकीय संधी शोधू लागतात हे पुन्हा पुन्हा स्पष्ट दिसते आहे. स्वातंत्र्यानंतर प्रदीर्घ काळ काँग्रेस पक्षाने आपल्या कथित धर्मनिरपेक्षतेचा पुरस्कार केला. परंतु प्रत्यक्षात त्यांची धर्मनिरपेक्षता अनेकदा तुष्टीकरणाच्या राजकारणाशी जोडलेली होती. त्यामुळे राम मंदिरासारख्या संवेदनशील विषयावर स्पष्ट भूमिका घेण्याचे धाडस काँग्रेसने सत्तेवर असताना कधीच दाखवले नाही. याउलट भारतीय जनता पक्षाने राम मंदिराचा मुद्दा सांस्कृतिक पुनर्जागरण आणि राष्ट्रीय अस्मितेच्या दृष्टिकोनातून मांडला. अनेक दशकांच्या जनआंदोलनानंतर आणि कायदेशीर प्रक्रियेचा आदर राखत मंदिर उभारणीचा मार्ग मोकळा झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालेला प्राणप्रतिष्ठा सोहळा हा देशासाठी ऐतिहासिक क्षण ठरला. या कार्यक्रमाला मिळालेले अभूतपूर्व जनसमर्थन हेच दर्शवते की राम मंदिर हा केवळ राजकीय नव्हे तर राष्ट्रीय भावनेचा विषय आहे. अशा परिस्थितीत मंदिराशी संबंधित कोणत्याही वादाचा आधार घेत काँग्रेसकडून पुन्हा राजकारण करण्याचा प्रयत्न होतो आहे हे जनतेलाच रुचणारे नाही. एखाद्या विषयाची चौकशी व्हावी, त्यात पारदर्शकता राखली जावी अशा मागणीला कुणाचाच विरोध नाही. आज अयोध्येतील भव्य राम मंदिर हे भारताच्या सांस्कृतिक पुनरुत्थानाचे प्रतीक बनले आहे. अशावेळी विकास, पर्यटन, रोजगार आणि सांस्कृतिक अभिमान यांवर चर्चा होणे अपेक्षित असताना काँग्रेसने पुन्हा जुन्या राजकारणाचा मार्ग स्वीकारल्याची भावना अनेकांच्या मनात निर्माण होते आहे. श्रद्धेच्या विषयांवर राजकीय लाभाचे गणित मांडण्याऐवजी राष्ट्रीय हिताला प्राधान्य देण्याची अपेक्षा देशातील जनतेने राजकीय पक्षांकडून ठेवली आहे. मंदिराशी संबंधित कोणत्याही वादावर भारतीय जनता पक्षाची भूमिका तथ्ये आणि पारदर्शकतेच्या आधारे आवश्यक चौकशी व्हावी अशीच आहे. भविष्यात असे वाद निर्माण होऊ नयेत आणि रामभक्तांच्या श्रद्धेला धक्का पोहोचू नये यासाठी तीर्थक्षेत्र न्यासाने प्रभावी उपाययोजना कराव्यात अशी अपेक्षा राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही व्यक्त केली आहे. परंतु या निमित्ताने राम मंदिराच्या ऐतिहासिक कार्यावर किंवा श्रद्धाळूंच्या भावनांवर राजकीय हल्ले होऊ नयेत. अयोध्येतील राम मंदिर हे राष्ट्राच्या सांस्कृतिक आत्मविश्वासाचे आणि पुनर्जागरणाचे प्रतीक आहे हे सगळ्यांनीच पक्षीय राजकारणापलीकडे जाऊन ध्यानात ठेवले पाहिजे.**

# थोर समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर



गोपाळ गणेश आगरकर म्हणजे एक बुद्धिप्रामाण्यावादी विचारवंत आणि थोर समाजसुधारक म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील टेंभू या गावी गरीब घराण्यात झाला. खेळणे, पोहणे, वाचणे यांत त्यांचे बालपण गेले. हालअपेष्टांना तोंड देत कराड, रत्नागिरी, अकोला आणि पुणे येथे राहून ते एमए झाले. अकोल्याच्या विष्णू मोरेश्वर महाजनींचे त्यांना मार्गदर्शन लाभले. आज त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा...

महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी पुण्यात निर्माण केलेल्या जहाल विचारांच्या राष्ट्रवादी पंथास आगरकर हे लोकमान्य टिळकांसह जाऊन मिळाले. लोकशिक्षण आणि लोकजागृती करण्यासाठी या तिघांनी पुण्यात न्यू इंग्लिश स्कूल स्थापन केले (१८८०) तसेच केसरी आणि मराठा (इंग्रजी) ही वर्तमानपत्रे चालू केली (१८८१). न्यू इंग्लिश स्कूलमध्ये आगरकरांनी अध्यापनाचे काम केले. त्याचप्रमाणे 'केसरी'च्या संपादनाची जबाबदारी स्वीकारली. न्यू इंग्लिश स्कूलच्या चालकांनी स्थापन केलेल्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणूनही त्यांनी अखेरपर्यंत काम केले.

महाविद्यालयीन जीवनातच जेरेमी बेंथम, जॉन स्ट्यूअर्ट मिल आणि हर्बर्ट स्पेन्सर यांच्या विचारांनी त्यांचे मन संस्कारित झाल्यामुळे त्यांचा दृष्टिकोन उदारमतवादी, बुद्धिप्रामाण्यवादी आणि अज्ञेयवादी झालेला होता. याच दृष्टिकोनातून तत्कालीन समाजाची शिलावस्था त्यांना जाचत होती व समाजजागृती करण्याची आवश्यकता त्यांना वाटत होती. 'केसरी'तील त्यांच्या सामाजिक लेखांतून हीच भूमिका व्यक्त होऊ लागली. सामाजिक प्रश्नांच्या जाणिवेपेक्षा राजकीय प्रश्नांची जाणीव अधिक तीव्र असली पाहिजे, असे 'केसरी' व मराठाच्या चालकमंडळींस वाटत असल्यामुळे आगरकरांचा वैचारिक कोंडमारा होऊ लागला. परिणामतः ते 'केसरी'तून बाहेर पडले (१८८७) आणि आपल्या क्रांतिकारक सामाजिक विचारांच्या प्रतिपादन-प्रसारासाठी सुधारक हे पत्र त्यांनी काढले. त्यात राजकीय व अर्थशास्त्रविषयक लेखही येत.

बुद्धिवादी दृष्टिकोनातून समाजजीवनाचे विश्लेषण करून अन्याय्य रूढी आणि परंपरा यांच्यावर त्यांनी कडाडून हल्ले चढविले. बुद्धीच्या निकषांखेरीज अन्य कोणताही निकष ते मानीत नसल्यामुळे समाजसुधारणांचे समर्थन करण्यासाठी स्मृतिवचनांचा आधार घेणे त्यांना मान्य नव्हते. नीतिमान आणि सदाचरणी समाजाच्या निर्मितीसाठी ईश्वर आणि धर्म यांचीही आवश्यकता त्यांना वाटत नव्हती. परोपकारादी सद्गुण धर्माच्या आधी अस्तित्वात आले असून नंतर धर्मात ते गोवले गेले, अशी त्यांची भूमिका होती. बुद्धिवाद, व्यक्तिवाद, समता, स्वातंत्र्य, वैज्ञानिक दृष्टी, इहवाद आणि मानवतावाद या सप्तःसूत्रीने त्यांचा सारा सामाजिक विचार व्यापलेला आहे. साहजिकच, पूर्वजन्म आणि पुनर्जन्म यांसारख्या कल्पनांवर त्यांचा विश्वास नव्हता आणि चातुर्वर्ण्य, जातिसंस्था, अस्पृश्यता, बालविवाह, ठरवून केलेले विवाह इ. गोष्टी त्यांना सर्वथैव अमान्य होत्या. मुला-मुलींस समान शिक्षण, कौशल्याधारित अभ्यासक्रम व व्यवसायाभिमुख शिक्षण द्यावे, दुष्ट आचारांचे निर्मूलन करावे, सदाचाराचा प्रसार करावा, ज्ञानवृद्धी करावी, सत्यसंशोधन करावी, भूतदया राखावी यासाठी ते प्रयत्नशील होते. मनुष्यजातीचे ऐहिक सुखवर्धन हेच त्यांचे ध्येय बनले होते. तथापि, निव्वळ इंद्रियसुखालाच ऐहिक सुख मानण्याइतपत त्यांची दृष्टी संकुचित नव्हती. नीतिमान आणि संयमी जीवनामुळे मनाला लाभणारे समाधानही या ऐहिक सुखात त्यांना अभिप्रेत होते. व्यक्तिस्वातंत्र्यामुळे स्वार्थ आणि स्वैराचार फैलावण्याऐवजी समाजातील व्यक्ती परोपकारी आणि परहितचिंतकच होतील, असे त्यांना वाटे. उलट व्यक्तिस्वातंत्र्य न मानणाऱ्या व निरुपयोगी परंपरांनी वेढलेल्या समाजाची केव्हाही प्रगती होऊ शकणार नाही, अशी त्यांची धारणा होती. परंपरांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन ऐतिहासिक होता. त्यामुळे एखादी गोष्ट समाजाच्या एका अवस्थेत उपयुक्त ठरली असेल, हे ते मान्य करीत, मात्र तीच गोष्ट बदलत्या काळात जाचक ठरल्यास बिनदिक्कतपणे टाकून द्यावी, असे ते म्हणत. अशा रूढी आणि परंपरा स्वखुषीने सोडून द्यावयास समाज तयार नसेल, तर त्या सरकारी मदतीने कायदेशीररीत्या नाहीशा कराव्या, असे त्यांचे मत होते. ज्या देशातील हजारो पिढ्यांनी अनेक गोष्टीत मोठ्या कष्टाने केलेल्या अनेक सुधारणांचे फळ आपणास आयतेच प्राप्त झाले अशा अनेक देशांतील धर्मांचा, रितीरिवाजांचा व लोकांचा सर्वथैव त्याग करणाऱ्या मनुष्यास खऱ्या सुधारकाची पदवी कधीही शोभणार नाही हे त्यांचे म्हणणे महत्त्वाचे आहे.

आगरकरांचे विचार तत्कालीन अंधश्रद्ध सामान्यांना समजले नाहीतच. तथापि, टिळकांसारख्या सुशिक्षित आणि चिंतनशील व्यक्तींचाही त्यांना पाठिंबा मिळू शकला नाही. जनतेचे लक्ष समाजक्रांतीवर केंद्रित करून त्यात तिची शक्ती वाया घालवण्यापेक्षा आधी राजकीय स्वातंत्र्यासाठी तिचा उपयोग करून घ्यावा तसेच सामाजिक रूढींच्या प्रश्नावर लोकांची मने दुखवून राजकीय चळवळीत फूट पाडू नये, असे टिळकांना वाटे. ईश्वर आणि धर्म यांच्याविषयीचे आगरकरांचे विचार रा.गो. भांडारकर आणि न्यायमूर्ती रानडे यांसारख्या सुधारक व्यक्तींनाही पटत नसत. सुधारकातील लेखांविरुद्ध चहुबाजूंनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागली. खुनाच्या धमक्या, प्रेतयात्रा काढणे इ. प्रकार झाले, परंतु 'इष्ट असेल ते बोलणार आणि साध्य असेल ते करणार', या भूमिकेतून सामाजिक सुधारणांचा कडवा पुरस्कार त्यांनी आमरण चालू ठेवला. सुधारकातील लेखांतून त्यांचे समाजजीवनाच्या विविध अंगांचे सूक्ष्म निरीक्षण आणि सखोल चिंतन प्रत्ययास येते. स्त्री-पुरुषांचा पोषाख, विधवांचे केशवपन, सोवळे-ओवळे, अंत्यविधी आणि अंत्यसंस्कार, केशकर्तन, पायतणे इ. विषय जसे त्यांत आहेत तसेच देवतांची उत्पत्ती, मूर्तिपूजा, आत्म्याची मरणोत्तर स्थिती इत्यादींसारखे तात्त्विक आणि धर्माशी निकटचा संबंध असलेले विषयही आहेत. सामाजिक सुधारणा आणि कायदा यांचे संबंध काय असावेत यासंबंधीची आपली भूमिका मांडण्यासाठी आणि समाजहितकारक कायद्यांच्या जोरदार पुरस्कारासाठी काही लेख लिहिले गेले आहेत, तर काही लेखांतून सामाजिक गुलामगिरीने जखडून गेलेल्या स्त्रियांच्या शिक्षणादी समस्यांविषयी मूलगामी विचार आलेले आहेत.

समाजोन्नतीचा ध्यास असल्याने समाजचिंतन हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव होता तसेच राजकीय विचारांच्या जहालपणात ते टिळकांच्या बरोबरच होते. राजकीय हक्क आणि राजकीय स्वातंत्र्य यांची तीव्र जाणीव त्यांच्या लेखांतून स्पष्टपणे प्रतिबिंबित झालेली आहे. चिपळूणकर निवर्तल्यानंतर महाराष्ट्रात राजकीय विचारजागृती घडवून आणण्याचे काम 'केसरी'तून बाहेर पडेपर्यंत त्यांनीच केले.

आपल्या वैचारिक लेखांनी मराठीतील निबंधसाहित्यात त्यांनी मोलाची भर घातली, पल्लेदार वाक्ये, मुद्देसूद प्रतिपादन, अन्वर्थक अलंकार आणि प्रासंगिक नर्मविनोद ही त्यांच्या लेखनशैलीची वैशिष्ट्ये. केशवसुत, ह. ना. आपटे यांसारख्या थोर साहित्यिकांवर आगरकरांचा वैचारिक व भाषिक प्रभाव होता. ज्याने आपल्या बुद्धिसामर्थ्याने व साधुत्वाने जगास वश केले, तो खरा शास्ता हे आगरकरांचे म्हणणे त्यांच्या वैचारिक व भाषिक क्षमतेचे निदर्शक आहे. त्यांच्या 'कवि, काव्य, काव्यरति' आणि 'शेक्सपिअर, भवभूति व कालिदास' यांसारख्या साहित्यविषयक निबंधांनी आजच्या काही टीकाकारांचे लक्ष वेधून घेतले असून त्यांनी आगरकरांना साहित्यशास्त्रातील काही मूलभूत तत्त्वांचा शास्त्रीय पद्धतीने विचार करणारे विचारवंत मानले आहे. काव्य आणि संवेदना यांचा विशेष संबंध, काव्यातील सत्य आणि शास्त्रीय सत्य, काव्यातील करुणरस, कविमन आणि काव्यनिर्मितिप्रक्रिया इत्यादींसंबंधीचे त्यांचे विचार या दृष्टीने कक्षणीय ठरतात. 'कोल्हापूर प्रकरणा'वरून १८८२मध्ये डोंगरी येथे टिळकांसह कारावास भोगत असतानाचे त्यांचे अनुभव त्यांनी डोंगरीच्या तुरुंगांत खेळकर आणि विनोदी शैलीत सांगितले आहेत. साहित्य अकादेमीनेही त्यांचे लेख प्रसिद्ध केले आहेत. यशोदाबाई फडके यांच्याशी विवाहबद्ध झालेल्या आगरकरांना दांपत्य जीवनात दुःख, दारिद्र्य, संकटे आल्याने बौद्धिक वातावरण नसल्याची खंत होती. दम्याच्या विकाराने पुणे येथे त्यांचे निधन झाले. (**साभार मराठी विश्वकोष**)



## बदलते तंत्रज्ञान

# सोशल मीडिया डीटॉक्सचा मेंदूवर काय परिणाम होतो?

सतत स्क्रोलिंग आणि नोटिफिकेशनमुळे आपला मेंदू कसा बदलतो आणि सात दिवसांचा ब्रेक काय कमाल




करू शकतो हे जाणून घेऊया. काही प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ असे म्हणतात की, सतत येणाऱ्या नोटिफिकेशनमुळे मेंदूमध्ये डोपामिन हे 'आनंदाचे रसायन' स्रवते. लाईक, कमेंट किंवा नवीन पोस्ट आली की आपल्याला बक्षीस मिळाल्यासारखे नवल वाटते.


यामुळेच आपण पुन्हा पुन्हा फोन तपासतो. यालाच 'डिजिटल ॲडिक्शन' असे म्हणतात. हळूहळू मेंदूला या डोपामिनची सवय होते आणि त्याशिवाय अस्वस्थ वाटू लागते. सात दिवसांचा डीटॉक्स म्हणजे मेंदूसाठी रिसेट बटण असते. काही संशोधनानुसार सात दिवस सोशल मीडिया बंद ठेवल्यास ताणाची पातळी २० टक्क्यांनी कमी होण्याची शक्यता असते. झोपेची गुणवत्ता सुधारते. कारण रात्री उशिरापर्यंत स्क्रोलिंग बंद होते. यामुळे मेलाटोनिन हार्मोन व्यवस्थित स्रवतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे एकाग्रता आणि स्मरणशक्ती वाढते. सतत सूचना येत नसल्याने मेंदूला एका कामावर लक्ष केंद्रित करणे सोपे जाते. सुरुवातीचे दोन-तीन दिवस मात्र कठीण जातात. FOMO म्हणजे 'काहीतरी महत्त्वाचे चुकत आहे' अशी भावना येते. चिडचिड होते, वेळ कसा घालवावा हे कळत नाही, पण चौथ्या दिवसापासून मेंदू रीसेट होऊ लागतो.

आपण पुन्हा पुस्तक वाचन, व्यायाम, कुटुंबासोबत प्रत्यक्ष गप्पा आणि छंदांसाठी वेळ देऊ लागतो. वास्तविक नातेसंबंध अधिक घट्ट होतात. डीटॉक्स यशस्वी करण्यासाठी काही सोपे नियम पाळा. डिजिटल संडे पाळा. आठवड्यातून एक दिवस पूर्णपणे सोशल मीडियाला सुट्टी द्या.

**झोपेचे नियम**

झोपताना फोन बेडरूमच्या बाहेर ठेवा. झोपण्याच्या एक तास आधी स्क्रीन बंद करा. नोटिफिकेशन बंद करा. सर्व ॲप्सची अनावश्यक नोटिफिकेशन बंद करा. तुम्ही ठरवले तेव्हाच ॲप उघडा. काही प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ म्हणतात की, सोशल मीडिया हे साधन आहे, मालक नाही. त्यावर नियंत्रण मिळवणे हे आजच्या काळातील मानसिक आरोग्यासाठी अत्यंत गरजेचे बनले आहे. डीटॉक्स म्हणजे पूर्णपणे बंद करणे नाही, तर त्याचा सुजाणपणे वापर करणे आहे.

# चौथे सरसंघचालक 'रज्जू भैय्या'



## निमित्त

प्रो. राजेंद्र सिंह, ज्यांना रज्जू भैय्या म्हणून ओळखले जाते, त्यांचा जन्म २९ जानेवारी १९२२ रोजी उत्तर प्रदेशातील बुलंदशहर येथे झाला. त्यांचे वडील बलबीर सिंह हे भारतीय अभियांत्रिकी सेवेसाठी निवड झालेले पहिले भारतीय होते.


रज्जू भैय्या यांचे प्राथमिक शिक्षण नैनितालमध्ये झाले; नंतर त्यांनी अलाहाबाद विद्यापीठात शिक्षण घेतले. ते भौतिकशास्त्राचे विद्यार्थी होते आणि अणुशास्त्र हा त्यांचा विशेष विषय होता. त्यांच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या उत्तरपत्रिका भारतीय नोबेल पुरस्कार विजेते डॉ. सी.व्ही. रमन यांनी तपासल्या. असे म्हटले जाते की डॉ. रमण त्यांच्या उत्तरांनी इतके प्रभावित झाले की त्यांनी त्यांना त्यांच्या हाताखाली संशोधन करण्यासाठी आमंत्रित केले. दरम्यान, त्यांना व्याख्याता पदावर नियुक्तीसाठी आमंत्रणही मिळाले. संशोधनाचा प्रस्ताव स्वीकारण्याऐवजी त्यांनी व्याख्याता पद स्वीकारले आणि १९६५ पर्यंत अलाहाबाद विद्यापीठात अध्यापन केले. १९६६ मध्ये ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक बनले.

रज्जू भैया नेहमीच सर्व भौतिक सुखांपासून अलिप्त राहिले आणि म्हणूनच त्यांना स्वतःसाठी काहीही नको होते. त्यांनी कमीत कमी कपडे वापरले. त्यांच्या स्वभावामुळे त्यांच्या वडिलांनी त्यांच्यासाठी अलाहाबादमधील सिव्हिल लाईन्स येथे एक घर बांधून दिले, परंतु त्यांनी ते सरस्वती शिशु मंदिर या शैक्षणिक संस्थेला दान केले. असेही म्हटले जाते की, त्याच्या वडिलांना आणि कुटुंबातील सदस्यांना कदाचित असे वाटले असेल की रज्जू भैया त्याला मिळणारी प्रत्येक गोष्ट एखाद्या सामाजिक संस्थेसाठी देतील, म्हणून त्याला त्याच्या वडिलांच्या मालमत्तेचा कोणताही वाटा देण्यात आला नाही.

स्वामी चिन्मयानंद यांच्या मते, ते (रज्जू भैया) नेहमीच त्यांच्या कुटुंबापासून अलिप्त राहिले. अलाहाबादमध्ये ते त्याच शिशु मंदिराच्या खोलीत राहत होते. त्यांनी आयुष्यातील बहुतेक काळ संघाच्या कार्यालयात घालवला. ते कोणत्याही बँकेत खातेदार नव्हते आणि त्यांच्याकडे एक इंचही जमीन नव्हती. त्यांच्या स्वभावातील साधेपणा आणि सर्वांशी सौहार्द यामुळे ते त्यांच्या स्वतःच्या शैलीचे माणूस बनले. संघाप्रती त्यांची प्रामाणिकता आणि पूर्ण समर्पण असूनही, राजकीय पक्षांमधील मोठ्या संख्येने लोक त्यांना पसंत करत होते.

सरसंघचालक या प्रतिष्ठित पदासाठी काम करताना ते नेहमीच सर्वांशी सौहार्दपूर्ण होते. शारीरिकदृष्ट्या ते आजारी पडले तरी त्याचा त्यांच्या मनावर आणि बुद्धीवर कधीही परिणाम झाला नाही. ते जिवंत असेपर्यंत सक्रिय राहिले. ते नेहमीच शिक्षण, सेवा, समर्पण आणि विचारांच्या सुसंवादाचे समर्थक होते. म्हणूनच, सरसंघचालक म्हणून त्यांनी घेतलेल्या सर्व निर्णयांमुळे संघाची व्याप्ती वाढण्यास मदत झाली. त्यांच्या उदारमतवादी विचारसरणीला व्यापक पाठिंबा मिळाला. वय, दर्जा, प्रतिष्ठेचा प्रभाव न पडता प्रत्येक व्यक्तीला एक व्यक्ती म्हणून वागवणे हे त्यांचे पहिले तत्व होते. १४ जुलै २००३ मध्ये त्यांचे निधन झाले. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



# आरोग्य प्रहर

## पाणी पिण्याच्या 'या' चुकीच्या पद्धतींनी होऊ शकतात आजार

पाणी हा जीवनाचा आधार आहे. आपल्या आरोग्यासाठी पाणी पिणे किती महत्त्वाचे आहे हे आपल्या सर्वांना माहीत आहे, पण तुम्हाला माहीत आहे का की पाणी पिण्याच्या चुकीच्या पद्धतीमुळे तुम्ही आजारी पडू शकतात? अनेकदा आपण पाणी पिण्याच्या पद्धतीबाबत निष्काळजी असतो, ज्याचा आपल्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो.



पाणी पिण्याच्या चुका ज्यामुळे तुम्ही आजारी पडू शकता: १. एकाच वेळी जास्त पाणी पिणे: एकाच वेळी जास्त पाणी पिणे शरीरातील पाण्याचे संतुलन बिघडू शकते. यामुळे डोकेदुखी, उलट्या, चक्कर येणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात.

२. अन्न खाल्ल्यानंतर लगेच पाणी पिणे : अन्न खाल्ल्यानंतर लगेच पाणी प्यायल्याने पचनक्रिया मंदावते आणि पोटात जडपणा येतो.

३. थंड पाणी पिणे: थंड पाणी प्यायल्याने पचनसंस्थेमध्ये समस्या उद्भवू शकतात आणि पोटदुखी, अपचन आणि गॅसची समस्या होऊ शकते.

४. गरम पाणी पिणे: खूप गरम पाणी प्यायल्याने घशाची जळजळ आणि अल्सर होऊ शकतात.

५. प्लास्टिकच्या बाटलीत पाणी ठेवणे: प्लास्टिकच्या बाटलीत पाणी ठेवल्याने प्लास्टिकचे कण पाण्यात मिसळतात, जे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतात.

६. घाणेरडे पाणी पिणे: घाणेरडे पाणी पिल्याने अतिसार, टायफॉइड, कॉलरा इत्यादी अनेक आजार होऊ शकतात.

**पाणी पिण्याची योग्य पद्धत**

१. पाणी हळूहळू प्या: लहान घोटात पाणी प्या, जेणेकरून शरीर ते सहजपणे शोषू शकेल. २. जेवल्यानंतर अर्ध्या तासाने पाणी प्या : जेवण केल्यांनतर अर्ध्या तासाने पाणी प्यायल्याने पचनक्रिया सुधारते. ३. थंड पाणी कमी प्या: कमी थंड पाणी प्या आणि सामान्य तापमानाचे पाणी प्या. ४. कमी गरम पाणी प्या: खूप गरम पाणी पिणे टाळा. ५. काचेच्या किंवा स्टीलच्या बाटल्यांमध्ये पाणी ठेवा: प्लास्टिकच्या बाटल्यांमध्ये पाणी ठेवणे टाळा. काचेच्या किंवा स्टीलच्या बाटलीत पाणी ठेवा. ६. उकळलेले पाणी प्या: घाणेरडे पाणी उकळून प्या, त्यामुळे त्यात असलेले हानिकारक बॅक्टेरिया नष्ट होतात.पाणी पिण्यातील चुका तुम्हाला आजारी बनवू शकतात, त्यामुळे या चुका टाळा आणि पाणी पिण्याच्या योग्य पद्धतीचा अवलंब करा.

# शाळाबाह्य मुलांसाठी राजिपची विशेष शोधमोहीम

## १५ ते ३० जुलै कालावधीत शोधणार शाळाबाह्य मुले

**अलिबाग : प्रतिनिधी**

बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिकार या कायद्यांतर्गत जिल्ह्यातील ६ ते १४ वयोगटातील कोणताही बालक शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी रायगड जिल्हा परिषदेच्या (राजिप ) शिक्षण विभागाकडून १५ ते ३० जुलैदरम्यान शाळाबाह्य मुलांची विशेष शोधमोहीम राबविण्यात येणार आहे. यासाठी अंगणवाडीसेविका, प्राथमिक व माध्यमिक विभागाचे शिक्षक विविध ठिकाणी भेटी देउन शाळाबाह्य मुले आढळल्यास त्यांना त्यांच्या वयानुसार इयत्तेमध्ये प्रवेश देण्यात येणार आहे.

बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिकार २००९च्या कायद्यांतर्गत ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकांस शिक्षणाचा अधिकार आहे. यासाठी राजिप शिक्षण विभागाकडून शाळाबाह्य मुलांची शोधमोहीम राबविण्यात येणार आहे. साधारणतः सप्टेंबर महिन्यानंतर राज्यातील ब-याच जिल्ह्यातून शेतमजूर, बांधकाम कामगार, कोळसा-वीटभट्टी कामगारांची कुटुंबे मोठ्या प्रमाणात स्थलांतरीत होत असतात. यामुळे अनेक वेळा अशा कुटुंबातील मुलांचे शिक्षण अर्धवट राहते. त्यामुळेच अशा मुलांच्या उज्वल भविष्यासाठी व त्यांना शाळेच्या प्रवाहात दाखल करणेसाठी विशेष शोध मोहीम १५ ते ३० जुलैदरम्यान राबविण्यात येणार आहे. या कालावधीत स्थलांतरीत होऊन येणा-या ३ ते १८ बयोगटातील प्रत्येक बालकास वयानुरूप समकक्ष वर्गात दाखल करण्यात येणार आहे. तसेच स्थलांतरीत होवून जाणा-या प्रत्येक विद्यार्थ्यांस शिक्षण हमीपत्र देण्यात येणार आहे.



या कालावधीत रेल्वेस्टेशन, बसस्थानके, गावाबाहेरची वस्ती, वीटभट्ट्या, शेतमजुर, बांधकाम कामगारख् स्थलांतरीत कुटुंबे, झोपड्या, फुले व अन्य वस्तू विकणारी तसेच रस्त्यावर भिक मागणारी बालके, अस्थायी निवारा करणारी कुटुंबे, इत्यादी ठिकाणी अंगणवाडीसेविका, शिक्षक भेट देउन पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणार आहेत. तसेच अशा शाळाबाह्य मुलांची माहिती घेउन त्यांना वयानुरूप समकक्ष वर्गात दाखल करण्यात येणार आहे. पालकांनीही या शोधमोहिमेला सहकार्य करावे, असे आवाहन रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हाधिकारी किशन जावळे, शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) ललिता दहितुले यांनी केले आहे.

अनेकदा बांधकाम कामगार, वीटभट्टी कामगार वर्षातून २ ते ३ वेळा विविध ठिकाणी स्थलांतर करतात. अशा वेळी त्यांच्या मुलांचे शिक्षण थांबू नये व त्यांना दुस-या शाळेत प्रवेश मिळावा यासाठी विद्यार्थ्याला शिक्षण हमीपत्र देण्यात येणार आहे.

# माणगावमध्ये पाणीपुरवठा बंद; नागरिकांकडून 'सीईओं'चा निषेध

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायत वार्ड क्र. १७मधील जुने माणगाव मस्जिद मोहल्ला व कुंभार आळी येथील पाणीपुरवठा बंद झाल्याने या पाणी प्रश्नासंदर्भात मुख्याधिकारी यांनी चर्चेकरिता नगरपंचायत कार्यालयात या वार्डातील ग्रामस्थांना वेळ ठरवून दिली होती, मात्र दिलेल्या दिवशी व वेळेत मुख्याधिकारी चर्चेसाठी उपस्थित राहिले नाहीत. त्यांच्या या मुजोर वागणुकीमुळे वार्ड क्र. १७ मधील ग्रामस्थांनी त्यांचा जाहीर निषेध करून तीव्र संताप व्यक्त केला आहे.



याबाबत मुख्याधिकरी संतोष माळी यांचेकडे आमच्या प्रतिनिधीने दूरध्वनीद्वारे संपर्क साधला असता नंतर कॉल करतो असे सांगून सायंकाळी उशिरापर्यंत आपले म्हणणे काहीच सांगितले नाही. माणगाव नगरपंचायत वार्ड क्र. १७ मधील जुने माणगाव मस्जिद मोहल्ला व कुंभार आळी येथील ग्रामस्थांना स्वतंत्र पाणी योजना असून ही पाणी योजना नगरपंचायतीकडे ग्रामस्थांनी हस्तांतरित केली आहे. याठिकाणी असणारा पाण्याचा पंप हा बिघडल्याने येथील ग्रामस्थांनी वॉर्डाचे नगरसेवक दिनेश रातवडकर यांचेशी संपर्क साधून त्यांची भेट घेतली. त्यानंतर नगरसेवक रातवडकर यांनी मुख्याधिकारी संतोष माळी यांच्याशी या पाण्याच्या बंद मशीन संदर्भात चर्चा करण्यासाठी वेळ मागितली होती.

मुख्याधिकारी यांनी येथील ग्रामस्थांना सोमवार दि.१३ जुलै रोजी दुपारी १२ वाजता नगरपंचायत कार्यालयात चर्चेकरिता बोलाविले होते. मात्र प्रत्यक्षात मुख्याधिकारीच या चर्चेला उपस्थित राहिले नाहीत. नगरसेवक,ग्रामस्थ यांनी त्यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही त्यांना प्रतिसाद दिला नाही. त्यांच्या या वागणुकीने या वॉर्डातील ग्रामस्थांनी त्यांचा निषेध करून तीव्र संताप व्यक्त केला आहे.

यावेळी नगरपंचायत कार्यालयात माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक ज्ञानदेव पवार,पाणी पुरवठा सभापती अजित तार्लेकर,नगरसेवक राजेश मेहता,नगरसेवक कपिल गायकवाड तसेच या १७ नंबर वॉर्डचे नगरसेवक दिनेश रातवडकर उपस्थित होते. तसेच मस्जिद मोहल्ला अध्यक्ष सिद्दिक परदेशी,उपाध्यक्ष महंमदअली धुनवारे यांच्यासह मस्जिद मोहल्ला व कुंभारआळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मुख्याधिकारी यांच्या अनुपस्थितीत नगरसेवक व पाणी पुरवठा सभापती यांच्याशी झालेल्या चर्चेत सध्या या ग्रामस्थांना पाणी पंप दुरुस्त होईपर्यंत हा प्रश्न निकाली लागेपर्यंत टँकरने मुबलक पाणी पुरवठा स्वखर्चाने करण्यात येईल असे वॉर्डचे नगरसेवक दिनेश रातवडकर यांनी आश्वासित केल्याचे मस्जिद मोहल्ला अध्यक्ष सिद्दिक परदेशी यांनी सांगून नगरसेवक दिनेश रातवडकर यांचे ग्रामस्थांतर्फे विशेष आभार मानले.

# धामणदिवीतील आरोग्य उपकेंद्राला आरोग्य केंद्राचा दर्जा देण्याची मागणी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पंचायत समितीचे सभापती अविनाश शिंदे यांनी पळचिल प्राथमिक आरोग्य केंद्राला अचानक पाहाणी भेट दिल्यानंतर तेथील डॉक्टरांसह कर्मचारी हजर नसल्याच्या घटनेची चर्चा तालुक्यात सर्वत्र सुरू झाली असताना धामणदिवी सरपंच क्षमता बांद्रे यांनी जुन्या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील डेंजर झोनमुळे पळचिल प्राथमिक आरोग्य केंद्र दूर्गम झाल्याने महामार्गालगत असलेल्या धामणदिवीतील आरोग्य उपकेंद्राला आरोग्य केंद्राचा दर्जा देण्याची मागणी केली आहे.




पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाशेजारी असलेले प्राथमिक आरोग्य केंद्र तत्कालीन ग्रामविकास मंत्री प्रभाकर मोरे यांच्या पाठपुराव्याने पळचिल गावामध्ये स्थलांतरित करण्यात आले. आदिती तटकरे या रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री झाल्यानंतर २२ जानेवारी २०२१ रोजी त्यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. यानंतर केवळ दोनच वर्षांनी मुंबई गोवा महामार्गावरील धामणदिवी आरोग्य उपकेंद्रापासून ५०० मीटर्स अंतरावरील पळचिलकडे जार्णाया कशेडी घाटरस्त्याचा वापर बंद होऊन कातळी भोगाव येथील भुयारी मार्गाचा वापर सुरू झाला.

एकीकडे, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ कातळी भोगावच्या भुयारी मार्गातून गेला, तर दुसरीकडे पळचिल प्राथमिक आरोग्य केंद्राकडे जाणारा रस्ता बंद झाला आहे.

त्यामुळे परिसरातील रुग्णांना पळचिल येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पोहोचता येण्याची सहजता नष्ट झाली असल्याने धामणदिवी येथील आरोग्य उपकेंद्राला आरोग्य केंद्राचा दर्जा देऊन दूर्गम झाल्याने पळचिल प्राथमिक आरोग्य केंद्राला उपकेंद्राचा दर्जा देण्यात यावा, ही धामणदिवीच्या सरपंच क्षमता राजेश बांद्रे यांची मागणी योग्य ठरत आहे.

सद्यस्थितीत पळचिल प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सेविका, शिपाई, लेडी अटेंडंट अशी पदे रिक्त आहेत तर क्लार्क, आरोग्य सहाय्यक आणि आरोग्य सहायक महिला, मेडिकल ऑफिसर प्रथम श्रेणी, मेडिकल ऑफिसर द्वितीय श्रेणी कॉन्ट्रॅक्ट बेसिस अशा नियुया कार्यरत असून मेडिकल ऑफिसर द्वितीय श्रेणी पदाची मुदतवाढीचे पत्र ३० जून रोजी मुदत संपल्यानंतर मिळाले नसूनही द्वितीय श्रेणी मेडिकल ऑफिसर अद्याप सेवेत आहेत, एक्स रे कक्ष आहे पण एक्स रे मशीन व ऑपरेटर नाही, औषध साठा पुरेसा आहे पण बाह्य रुग्ण व अंतररुग्ण दाखल संख्या अत्यल्प आहे.

पळचिल प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांना राहण्याची सोय आहे. पण संपूर्ण इमारतीला विद्युत पुरवठा व पाणी पुरवठा करण्यात ग्रामपंचायत तसेच महावितरण पत्रव्यवहार करुनही दूर्लक्ष करीत आहे.

पळचिल प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत ४६ गावं असून सवाद आरोग्य उपकेंद्र ३५ किमी अंतरावर असून धामणदिवी, कुडपण व पैठण, तुर्भे बुद्रुक उपकेंद्र पळचिल प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत कार्यरत आहेत. पळचिल आरोग्य केंद्र दूर्गम व रुग्णांपासून फारकत घेतलेले आहे तर आरोग्य उपकेंद्राला रुग्णसेवेच्या सुविधा मर्यादित आहेत.

पळचिल प्राथमिक आरोग्य केंद्राला पळचिल १८६, गोलदरा ६८ खडकवणे अशी लगतच्या गावातील ३१५ लोकसंख्या संलग्न आहे तर चरई, काटेतळी, सडवली, चोळई, धामणदिवी, भोगाव बुद्रुक, कातळी, फणस कोंड, महालगुर, कोंढवी, भोगाव बुद्रुक या ३ हजार ९७ लोकसंख्येचा धामणदिवी आरोग्य उपकेंद्राशी थेट संपर्क येतो. या खेरीज, त्या काळी जोडलेले ग्रामपंचायत पोलादपूर आता नगरपंचायत होऊनही अद्याप पळचिल प्राथमिक आरोग्य केंद्राला जोडलेले असल्याची स्थिती आहे.

# तत्परतेने शेड उभारणी



**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तहसील कार्यालयातील सेतू विभागासाठी नवीन प्रशासकीय कार्यालयाला लागूनच शेडची उभारणी करण्यात येत आहे. त्यामुळे सेतू कार्यालयात येणाऱ्या नागरिकांची सोय होणार आहे.

खालापूर तालुक्याला नवीन प्रशासकीय इमारत बांधण्यात आली असून तिचा लोकार्पण सोहळा आमदार महेश बालदी, आमदार महेंद्र थोरवे व जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत पार पडला. या इमारतीत तळ मजल्यावर सेतू कार्यालय सुरू करण्यात आले असून प्रशासकीय इमारतीला लागूनच तहसीलदारांच्या पुढाकाराने शेडची उभारणी करण्यात येत आहे.

# वासांबे ग्रामपंचायत हद्दीत 'एसआयआर'ला सुरुवात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या वासांबे (मोहोपाडा) ग्रुप ग्रामपंचायतीच्या हद्दीत मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या सूचनेनुसार मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण (एसआआर) मोहीम राबवण्यात येत आहे.

लोकशाही बळकट करण्यासाठी आणि मतदार यादीतील त्रुटी दूर करून मतदारांची नोंदणी करण्यासाठी हा महत्त्वाचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.या मोहिमेचे वेळापत्रक प्रशासनाने जाहीर केले असून, त्यानुसार ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत घरोघरी जाऊन माहिती संकलित केली जाणार आहे.यासाठी शाळा, मंदिर, शासकीय कार्यालये येथे एसआयआर कार्यक्रम सुरू आहे.यानंतर ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रकाशित केली जाईल. या यादीवर ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत नागरिक आपले दावे आणि हरकती नोंदवू शकतील,ज्यांचे निराकरण ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबर २०२६ पर्यंत केले जाईल. या प्रक्रियेनंतर ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादीचे प्रकाशन करण्यात येणार आहे.

वासांबे ग्रामपंचायतीच्या सरपंच उमा मुंढे यांनी या मोहिमेचे महत्त्व अधोरेखित करत परिसरातील सर्व नागरिकांना आपल्या मतदानाची पात्रता तपासण्याचे आवाहन केले आहे .त्या अनुषंगाने परिसरात मुंढे यांनी या मोहिमेचे महत्त्व अधोरेखित करत परिसरातील सर्व नागरिकांना आपल्या मतदानाची पात्रता तपासण्याचे आवाहन केले होते.नागरिकांनी अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळ voters.eci.gov.in किंवा ECINET ॲपचा वापर करावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# कर्जतमध्ये विराट हिंदू संमेलन

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील किरवली येथील शेळके मंगल कार्यालयात हिंदू समाजाच्यावतीने आयोजित करण्यात आलेले विराट हिंदू संमेलन रविवारी अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. धर्म, संस्कृती आणि राष्ट्ररक्षणाचा संदेश देणाऱ्या या संमेलनाला हजारोंच्या संख्येने हिंदू बांधवांनी उपस्थिती लावत संपूर्ण परिसर भगवामय केला. जय श्रीरामच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

कार्यक्रमात ॲड श्रीराम ठोसर, ॲड दीपक गायकवाड आणि मैत्रेय जीवजी यांनी प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन केले. तिन्ही वयांनी हिंदू समाजातील संघटन, सामाजिक जागरूकता आणि राष्ट्रहिताच्या विविध विषयांवर परखड भूमिका मांडल्या.ॲड दीपक गायकवाड यांनी आपल्या आक्रमक भाषणात लव्ह जिहाद, धर्मांतर, हिंदू समाजाची एकजूट आणि हिंदू मुलींच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर स्पष्ट भूमिका मांडली. तसेच अयोध्येतील श्रीराम मंदिर उभारणी हा संपूर्ण हिंदू समाजाच्या श्रद्धा, संघर्ष आणि स्वाभिमानाचा विजय असल्याचे सांगत हिंदूंनी संघटित राहून धर्म आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले.

ॲड श्रीराम ठोसर यांनी हिंदू समाजाने सामाजिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रीय प्रश्नांवर एकत्र येण्याची गरज अधोरेखित केली. हिंदू संस्कृतीचे जतन आणि राष्ट्रहितासाठी प्रत्येकाने जबाबदारीने कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

मैत्रेय जीवजी यांनी आपल्या भाषणात भारतीय संस्कृती, सनातन परंपरा आणि युवकांची समाजाप्रती असलेली जबाबदारी यावर मार्गदर्शन केले. संघटित हिंदू समाजच राष्ट्राला अधिक सक्षम बनवू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी कर्जत तालुक्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या तरुणांचा तसेच नुकतीच पोलिस सेवेत भरती झालेल्या युवक-युवतींचा विशेष सत्कार करून त्यांचा सन्मान करण्यात आला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात या गुणवंतांचे अभिनंदन केले.




# वावेहवेली येथे वृक्षारोपण उपक्रम




**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील वावेहवेली येथे के बी सी संघ वावेहवेली यांचे माध्यमातून ग्रामस्थ, महिला मंडळ, मुंबईकर मंडळ यांनी वावेहवेली गाव परिसरात व धरण परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या प्रमाणात केले आहे. सदर कार्यक्रमास मुंबईकरमंडळी,ग्रामस्थ मंडळी, महिला व तरुणवर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

एक झाड लावूया हिरवे भविष्य घडवूया हि घोषणा देवून मान्यवर व्यक्तीने वृक्षारोपण काळाजी गरज आहे.याची माहिती देऊन प्रत्येकांनी वृक्ष लावून ते जागविले पाहिजे व पर्यावरणाचे रक्षण आपण सर्वांनी केले पाहिजे असे उपस्थितानी ठरवून वृक्षारोपण केले.यापुढे वृक्षारोपण हा कार्यक्रम आमच्यासाठी महत्वाचा आहे आणि दरवर्षी करण्याचा मनोदय सर्वांनी व्यक्त केला आहे.

गावातील तरुण मंडळी व गावचे मंडळ यांनी हा कार्यक्रम ठरवून एक चांगले पाऊल उचलले आहे.त्यामुळे गावाचेकौतुक होतांना पहावयास मिळत आहे.


महावितरण

## ई निविदा जाहिर सुचना

खालील कामाकरीता नामांकित आणि पंजीकृत ठेकेदारांकडून ई निविदा बोलाविण्यांत येत आहे.
निविदेचा तपशील खाली देण्यात येत आहे.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | कामाचा तपशील | निविदा रक्कम/ निविदा अनामत/ निविदा मुल्य | निविदा विक्री/ खरेदी दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | काअ / पनवेल ग्रा. / तां. / निविदा ०५ / २०२६-२७ | पनवेल ग्रा. विभागाअंतर्गत महाराष्ट्रातील विविध स्टोर्स मधुन प्राप्त झालेले मटेरियल आणि इकिविपमेंट (९ मिटर टन पर्यंत) वाहतूक व सामुग्री हाताळणीच्या कामाचा ठेका. | रू. ५.०० लाख रू.५०००/. रू. ११८० /. | १०.०७.२०२६ पासून २०.०७.२०२६ |

कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या.पनवेल (ग्रा) विभाग



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत श्री. बारकुराम त्रिंबक म्हात्रे, श्री. रतन त्रिंबक म्हात्रे, श्री. बाबू त्रिंबक म्हात्रे, श्री. जगन्नाथ त्रिंबक म्हात्रे, श्री. सुरेश त्रिंबक म्हात्रे, सुमती मदन म्हात्रे, सायली सत्यवान मते, मुरलीधर मदन म्हात्रे, सोमनाथ मदन म्हात्रे, अनिल मदन म्हात्रे, सुमन पुंडलिक म्हात्रे, सुश्मिता पद्माकर म्हसकर, नरेश पुंडलिक म्हात्रे, मंगेश पुंडलिक म्हात्रे, सुप्रिया संतोष म्हात्रे, सर्वेश संतोष म्हात्रे अ.पा. क आई सुप्रिया संतोष म्हात्रे, सृष्टी संतोष म्हात्रे अ.पा.क आई सुप्रिया संतोष म्हात्रे, अनिता संजय म्हात्रे, बारकुबाई नरेश म्हात्रे, बेबीबाई भालचंद्र पाटील, रेवती दत्ता तांबोळी यांच्या नावे अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकाकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. जिचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकत' असे उल्लेखलीले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-रोहिंजन, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| अनुक्रमांक | गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | ३३ | १/२/१/ब | ०-१८-७० पो.ख. ०-०१-३० एकूण ०-२०-०० | ०.१४ |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

दिनांक -१४/०७/२०२६

सही /-
**ॲड. सदिच्छा दिलीप अस्वले**

२०३, मोहिनील अपार्टमेंट, नवे पोपुड, म्हातवली, उरण, रायगड
पिन कोड - ४००७०२. मोबाईल नं. ७४०००९७२८६

# ठोक मानधन शिक्षकांना वेतनवाढ द्या!

## नमुंमपा महापौरांकडे निवेदनाद्वारे मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये मागील १५ वर्षांपासून ठोक मानधन तत्त्वावर शंभरहून अधिक शिक्षक कार्यरत आहेत, तर बालवाडी शिक्षकदेखील आहेत. अत्यंत कमी मानधनावर हे शिक्षक विद्यार्थ्यांना ज्ञानाचे धडे देत आहेत, तर दुसरीकडे संस्थांमार्फत पालिका शाळेत सेवेत असणाऱ्या शिक्षकांना दुपटीने वेतन दिले आहेत. ठोक मानधन शिक्षकांवर होणारा अन्याय दूर करावा यासाठी स्थायी समितीचे माजी सभापती नवीन गवते यांच्या नेतृत्वाखाली शिक्षकांनी महापौर सुजाता पाटील यांची भेट घेऊन निवेदन दिले.

त्याचप्रमाणे सभागृहनेते सागर नाईक, स्थायी समितीचे सभापती अशोक पाटील यांचीदेखील भेट घेऊन निवेदन देत चर्चा करण्यात आली. यावेळी सभागृहनेते सागर नाईक यांनी पुढील महासभेत ठोक मानधन शिक्षकांच्या मानधन वाढीचा प्रस्ताव मंजूर करून त्यांना न्याय देऊ, असे आश्वासित केले. त्यामुळे ठोक मानधन शिक्षकांचा वेतन वाढीचा प्रश्न मार्गी लागणार आहे.



शहरातील पालिका शाळांमध्ये ठोक मानधन तत्त्वावर प्राथमिक विभागात १०० शिक्षक असून त्यांना प्रति २२ हजार रुपये मानधन दिले जाते, तर ३० माध्यमिक शिक्षकांना २७ हजार, १२० बालवाडी शिक्षिकांना १६ हजार ५००, १२४ बालवाडी मदतनीस यांना १३ हजार २०० रुपये मानधन दिले जाते. या शिक्षकांना दिवाळी आणि मे महिन्याची उन्हाळी सुट्टी भरून दिली जात नाही. शिक्षकांना विद्यार्थ्यांना शिकवण्याबरोबरच इतर कामेदेखील दिली जातात. १५ वर्षांपासून काम करत असतानाही त्यांना ठोक मानधन तत्त्वावर ठेवण्यात आले आहे. दुसरीकडे महापालिकेच्या शाळांमध्ये संस्थांमार्फत नियुक्त शिक्षकांना ४० हजार ते ५२ हजार रुपये वेतन दिले जाते. ठोक मानधन शिक्षकांना अत्यल्प मानधन मिळत असल्याने त्यांना कुटुंब चालविण्यासाठी पर्यायी कामे करावी लागत आहेत.

दरम्यान, वनमंत्री गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेतील सफाई, एनएमएमटी व विविध आस्थापनातील कंत्राटी कामगारांना नुकतीच ७ हजार ५०० रुपयांनी भरीव पगार वाढ करण्यात आली, मात्र ठोक मानधनावर शिक्षक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्यांना प्रशासनाने १५ वर्षापासून सेवा करूनही अधांतरी ठेवले आहे. काही शिक्षकांनी माजी सभापती नवीन गवते यांच्या समवेत महापौर, सभागृहनेते आणि सभापतींची भेट घेऊन इतरांप्रमाणे आम्हालाही न्याय द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे. महापौर व सभागृहनेते, सभापतींनी याची दखल घेत ठोक मानधन शिक्षकांना वाढीव मानधन देण्यावर सहमती दर्शविली आहे.

> महापालिकेतील कंत्राटी असो की ठोक मानधन करणारा कर्मचारी त्यांना वेतनवाढ देण्याचा निर्णय वनमंत्री गणेश नाईक यांनी घेतला आहे. कंत्राटी कामगारांप्रमाणे ठोक मानधन शिक्षकांना मानधन वाढ देण्याचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना शिक्षक उपायुक्तांना देण्यात आल्या आहेत. येत्या महासभेत या विषयाला मंजुरी देऊन मानधनवाढीचा प्रश्न सोडविला जाईल.
>
> **–सागर नाईक,** सभागृहनेते, नमुंमपा

> सुमारे ३७४ ठोक मानधन तत्त्वारील शिक्षकांना सत्ताधारी आणि प्रशासनाने न्याय द्यावा, अशी मागणी करीत महापौर, सभागृहनेत्यांची भेट घेतली. सभागृहनेते सागर नाईक यांनी तत्काळ या शिक्षकांची वास्तविकता ऐकून घेत त्यांच्या मानधन वाढीचा प्रस्ताव महासभेत घेण्याचे आश्वासन दिले आहे. वनमंत्री गणेश नाईक हे नेहमी कामागारांच्या पाठीशी उभे आहेत. या शिक्षकांनाही न्याय मिळेल.
>
> **–नवीन गवते,** माजी स्थायी समिती सभापती

# घणसोलीतील आठवडा बाजार बंद करा!

## नगरसेवक सकपाळ यांची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

घणसोली गावातील अनधिकृत रविवार आठवडे बाजार आणि मुख्य रस्त्यावरील अतिक्रमणाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका, पोलीस प्रशासन आणि स्थानिक नागरिकांच्या सहभागातून नुकतीच करण्यात आलेली कारवाई नागरिकांनी स्वागतार्ह मानली आहे, मात्र ही कारवाई एका दिवसापुरती न ठेवता कायमस्वरूपी आठवडा बाजार बंद करावा, अशी मागणी भाजपचे नगरसेवक गणेश सकपाळ यांनी पालिकेकडे केली आहे.

घणसोली बाजार भरत असल्याने सातत्याने वाहतूक कोंडी वाढली आहे. गर्दीचा फायदा घेत चोऱ्यांचे प्रमाण, महिलांना आणि मुलींना असभ्य पद्धतीने स्पर्श करण्याच्या घटनाही वाढल्या आहेत. अशा अनेक तक्रारी लोकप्रतिनिधींपर्यंत पोहचत आहेत. याआधी अतिक्रमण विभागाने शहरातील अनेक गावांतील आठवडे बाजार बंद केले आहेत. मग घणसोली आठवडा बाजाराकडे दुर्लक्ष का केले जात आहे, असा प्रश्न उपस्थित करत पालिकेने स्वतःहून दखल घ्यावी, अशी मागणी सकपाळ यांनी केली. सहाय्यक आयुक्त आणि उपायुक्त अतिक्रमण यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी स्पष्ट केले की, रविवार–रविवार कारवाई करून प्रश्न सुटणार नाही. संबंधित विभागाने दररोज दोन ते तीन वेळा नियमित पाहणी करून अनधिकृत फेरीवाले, रस्त्यावर, गटारांवर आणि सार्वजनिक जागांवर व्यवसाय करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी.

घणसोली नाका ते श्री हनुमान मंदिर या मुख्य मार्गावरील अतिक्रमणामुळे वाहतूक विस्कळीत झाली असून एनएमएमटीची क्रमांक ८ बससेवादेखील बंद झाली आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असून परिवहन विभागाचे आर्थिक नुकसानही होत आहे. हा रस्ता कायमस्वरूपी अतिक्रमणमुक्त करून बससेवा तातडीने पूर्ववत सुरू करण्याची मागणी त्यांनी केली. मुख्य रस्त्यांवरील नो–पार्किंग नियमांची कठोर अंमलबजावणी करण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली. भविष्यात आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि इतर अत्यावश्यक सेवांना मार्ग मिळण्यात अडचण होऊ शकते, असा इशारा त्यांनी दिला.

अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईत अडथळा निर्माण करणाऱ्यांवर भारतीय न्याय संहितेअंतर्गत तत्काळ फौजदारी गुन्हा दाखल करावा. कोणत्याही दबावाला बळी न पडता प्रशासनाने कायद्याची कठोर अंमलबजावणी करावी, असेही सकपाळ यांनी सांगितले. महानगरपालिकेच्या मालकीच्या रस्ते, गटारे, पदपथ आणि सार्वजनिक जागांवर अनधिकृत व्यवसाय करण्यास मनाई असल्याचे कायमस्वरूपी सूचना फलक घणसोलीतील प्रमुख ठिकाणी लावावेत. त्यावर नागरिकांसाठी तक्रार हेल्पलाईन क्रमांक नमूद करावा, अशी मागणीही करण्यात आली. जर प्रशासनाने सातत्यपूर्ण कारवाई केली नाही आणि पुन्हा अतिक्रमण सुरू झाले, तर संपूर्ण प्रकरणाचे छायाचित्रे, पुरावे आणि नागरिकांच्या तक्रारींसह अहवाल महापालिका आयुक्त तसेच शासनाकडे सादर करणार असल्याचा इशाराही सकपाळ यांनी दिला.

> **रस्ता नागरिकांचा आहे, अतिक्रमण करणाऱ्यांचा नाही. घणसोली अतिक्रमणमुक्त करणे ही प्रशासनाची जबाबदारी असून त्यासाठी आम्ही शेवटपर्यंत पाठपुरावा करू.**
>
> **–गणेश सकपाळ, नगरसेवक, भाजप**

# न्हावाशेवा वाहतूक पोलिसांनी दिले विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेचे धडे

**उरण : प्रतिनिधी**

नवी मुंबई वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त राहुल खाडे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या ‘शाळा दत्तक योजना २०२६–२७’ अंतर्गत न्हावाशेवा वाहतूक शाखेने सोमवारी (दि. १३) न्हावे येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये वाहतूक प्रबोधन कार्यक्रम घेतला. विद्यार्थी व शिक्षकांमध्ये लहान वयातच वाहतूक नियमांची जाणीव निर्माण व्हावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

नवी मुंबई वाहतूक आयुक्तालयाने परिसरातील सर्वच शाळांमध्ये वाहतूक नियमांचे प्रबोधन करण्यासाठी ‘शाळा दत्तक योजना’ सुरू केली आहे. न्हावाशेवा वाहतूक शाखेच्या हद्दीत एकूण १६ शाळा आहेत. प्रत्येक शाळा एका पोलीस अंमलदाराला दत्तक देण्यात आली असून नेमले अंमलदार नियमितपणे शाळेत जाऊन विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत आहेत. या उपक्रमांतर्गत न्हावाशेवा वाहतूक शाखेतील पोलीस हवालदार संजय बोटे यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेला भेट दिली.



यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेचे महत्त्व, झेब्रा क्रॉसिंगचा वापर, सिग्नलचे नियम, हेल्मेट व सीटबेल्टची आवश्यकता तसेच सायकल व पादचारी सुरक्षा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. पो. हवालदार संजय बोटे यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की, वाहतूक नियमांबाबत काही अडचण किंवा सूचना असल्यास बिनधास्तपणे सांगा. कारण तुम्हीच उद्याचे जबाबदार नागरिक आहात. या प्रबोधन कार्यक्रमास रयत शिक्षण संस्था न्यू इंग्लिश स्कूल न्हावे गावचे प्राचार्य प्रमोद कोळी, शिक्षिका करुणा पाटील व माधुरी पाटील तसेच पोलीस हवालदार किरण म्हात्रे, पोलीस नाईक निलेश मोरे, पोलीस शिपाई प्रफुल्ल शिंदे यांच्यासह ६० विद्यार्थी उपस्थित होते.

नवी मुंबई वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, लहान वयातच वाहतूक शिस्त अंगी बाणली तर भविष्यातील अपघातांचे प्रमाण निश्चित कमी होईल. ‘शाळा दत्तक योजना’ ही केवळ नियमांची माहिती देण्यासाठी नसून विद्यार्थ्यांमधूनच वाहतूक दूत घडवण्याचा प्रयत्न आहे. हे विद्यार्थी आपल्या कुटुंबाला व समाजालाही नियम पाळण्यास प्रेरित करतील. न्हावाशेवा वाहतूक शाखेच्या हद्दीतील उर्वरित १५ शाळांमध्येही टप्प्याटप्प्याने असे प्रबोधन कार्यक्रम राबवले जाणार आहेत. प्रत्येक दत्तक अंमलदार महिन्यातून एकदा शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करणार आहे. ‘सुरक्षित रस्ता, सुरक्षित जीवन’ या घोषवाक्यासह नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी सुरू केलेला हा उपक्रम रायगड जिल्ह्यातील शाळांसाठी पथदर्शी ठरणार आहे.

# अरुण दत्तेंच्या कार्यशाळेत बालमूर्तिकार कुशलची एण्ट्री!

## कलेच्या बारकाव्यांवर चर्चा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेलमधील सात वर्षीय बालमूर्तिकार कुशल अमित जाधव याने नुकतीच मुंबईतील प्रसिद्ध मूर्तिकार अरुण दत्ते यांच्या परळ येथील कार्यशाळेला भेट दिली. यावेळी त्याने मूर्तिनिर्मितीच्या विविध तांत्रिक बाबी आणि कलात्मक बारकावे जाणून घेतले.



मुंबईतील प्रसिद्ध आणि नाविन्यपूर्ण मूर्तिकार अरुण दत्ते हे जिवंत भासणाऱ्या तसेच वैशिष्ट्यपूर्ण गणेश आणि देवीच्या मूर्तींसाठी देशभर ओळखले जातात. पारंपरिक शिल्पकलेला आधुनिक कल्पकतेची जोड देत त्यांनी अनेक आगळ्यावेगळ्या संकल्पना साकारल्या आहेत. २०२५मध्ये त्यांनी घडविलेली ‘परेलचा महाराज’ गणेशमूर्ती विशेष चर्चेत होती. ‘बॅलन्स कॉन्सेप्ट’वर आधारित ही मूर्ती गुरुत्वाकर्षणाच्या नियमांनाच आव्हान देत हवेत तरंगत असल्याचा भास देत होती. या अद्वितीय कलाकृतीचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले होते. भारतीय शिल्पकलेतील नाविन्यपूर्ण प्रयोगाचे उदाहरण म्हणून देशभरातून तिचे कौतुक झाले. याच प्रसिद्ध मूर्तिकार अरुण दत्ते यांच्या परळ येथील कार्यशाळेत कुशल अमित जाधवने भेट घेतली. मूर्तीकलेची आवड आणि शिकण्याची जिद्द असलेल्या कुशलने दत्ते यांच्याकडून मूर्तिनिर्मितीच्या तांत्रिक बाबी, संकल्पना आणि कलात्मक बारकावे यांची सविस्तर माहिती घेतली. कुशलची कला, जिज्ञासा आणि शिकण्याची तळमळ पाहून अरुण दत्ते यांनी त्याचे मनापासून कौतुक केले. भविष्यात उत्कृष्ट मूर्तिकार होण्यासाठी सातत्याने सराव, निरीक्षण आणि नाविन्यपूर्ण विचार करण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

अनेक वर्षांपासून विविध प्रकारच्या आकर्षक गणेशमूर्ती साकारत अरुण दत्ते यांनी स्वतःची ओळख निर्माण केली आहे. ‘परेलचा महाराज’ ही त्यांची ‘बॅलन्स कॉन्सेप्ट’वरील कलाकृती भारतीय कलाकारांच्या अमर्याद कल्पकतेचा आणि सर्जनशीलतेचा उत्कृष्ट नमुना मानली जाते. या प्रेरणादायी भेटीद्वारे कुशलला देशातील आघाडीच्या मूर्तिकाराकडून प्रत्यक्ष मार्गदर्शन घेण्याची संधी मिळाली.



# अंगणवाडी विद्यार्थ्यांना साहित्य, मुलींना सॅनेटरी नॅपकिन वाटप

**उरण : वार्ताहर**

श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहाय्यता संस्था, उरण यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत अंगणवाडीतील विद्यार्थ्यांसाठी तसेच किशोरवयीन मुलींसाठी आरोग्य आणि शिक्षणविषयक उपक्रम राबविण्यात आले. अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य म्हणून पाट्या, दप्तर, पेन्सिल तसेच चॉकलेटचे मोफत वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे लहान विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल उत्साह निर्माण झाला. त्यानंतर तु. ह. वाजेकर फुंडे हायस्कूल येथे किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी स्वच्छता व आरोग्य जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमात मासिक पाळीदरम्यान घ्यावयाची स्वच्छतेची काळजी, योग्य सवयी, पोषण आणि आरोग्याचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले तसेच विद्यार्थिनींना कॉटन सॅनेटरी नॅपकिनचे मोफत वाटप करण्यात आले. संस्थेच्या अध्यक्षा संगीता सचिन ढेरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. यावेळी संस्थेच्या सचिव कविता राकेश म्हात्रे, खजिनदार शमायला साबीर सोंडे तसेच अभया म्हात्रे, मीना रावल आणि मीनाक्षी कोळी यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले.





**पनवेल : भारतीय जनता युवा मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीसपदी अक्षय सिंग यांची नियुक्ती झाली आहे. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांनी अक्षय यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी नगरसेविका प्रतिभा भोईर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, विवेक होन, मयूर कदम, राहुल घरत, यश भोईर आदी उपस्थित होते.**



खारघर : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर व विज्ञान महाविद्यालयात सोमवारी ग्रंथालय समितीतर्फे संस्थेचे स्फूर्तिस्थान स्व. चांगू काना ठाकूर यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रभारी प्राचार्य डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले तसेच आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे नियोजन ग्रंथालय समिती समन्वयक प्रा. डॉ. पूजा लांजेकर यांनी केले. ग्रंथपाल समाधान बेहेरे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी महाविद्यालयातील विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून अभिवादन केले.





पनवेल : चंदूकाका सराफ सुवर्णपेढीच्या शाखेचा पहिला वर्धापन दिन नुकताच साजरा झाला. यावेळी नगरसेविका सुरेखा मोहोकर, माधवी म्हात्रे, निवेदिता मोरे, साक्षी सागवेकर, प्रणिता गुल्हाने, रेश्मा कुरूप, पल्लवी पाटील आदी उपस्थित होत्या. त्यांचा सेल्स क्लस्टर ओमकार तिवारी, ब्रँच मॅनेजर अमेय जोशी, फ्लोर मॅनेजर श्याम यांनी स्वागत व सन्मान केला.

# रायगडमधील २० धरणे फुल्ल

## पाणीटंचाईची समस्या दूर

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात जुलैच्या पहिल्याच आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसाने धरणांच्या पाणी पातळीमध्ये मोठी वाढ झाली आहे. २८ लघु पाटबंधारे धरणांपैकी २० धरणे शंभर टक्के भरली असून २८ धरणांमध्ये ८८.२२ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.गेल्या पाच वर्षांतील पाणीसाठ्याची ही सर्वाधिक टक्केवारी आहे.



गेल्या वर्षी पावसाने मे महिन्यापासून सुरुवात केली. मात्र यावर्षी २० जूननंतर मोसमी पावसाला सुरुवात झाली. पावसाला उशिरा सुरुवात झाल्याने जिल्हयात पाणी टंचाईची स्थिती गंभीर बनली होती. अखेरपर्यंत ८४ टँकरने टंचाईग्रस्त गावांना पाणी पुरवठा करण्याची वेळ आली. मागील वर्षांतील टँकरच्या संख्येचा विक्रम असावा असे सांगितले जाते. त्यामुळे सर्वचजण मोसमी पावसाची आतुरतेने वाट पहात होते.अखेर २० जून नंतर रायगड जिल्ह्यात मोसमी पावसाला सुरुवात झाली. सुरवातीला पावसाचा जोर कमी होता. मात्र जून महिन्याच्या शेवटी आणि जुलैच्या पहिल्या आठवड्यात पावसाने हाहाकार उडवून दिला.

या मुसळधार पावसामुळे रायगड जिल्ह्यातील धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणीसाठा वाढला असून, जिल्ह्यातील २७ पैकी तब्बल २० धरणे शंभर टक्के भरली आहेत. सध्या सर्व धरणांमध्ये मिळून ८८.२२ टक्के जलसाठा असून, ८९.३६ दशलक्ष घनमीटर पाणी उपलब्ध झाले आहे.त्यामुळे गेल्या महिनाभरापासून निर्माण झालेले पाणीटंचाईचे संकट दूर झाले आहे. मात्र, कर्जत तालुक्यातील साळोख आणि अवसरे या धरणांतील जलसाठा अद्यापही केवळ २७ ते ३१ टयांवर असल्याने याकडे प्रशासनाचे लक्ष कायम आहे.

कोलाड येथील रायगड पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत एकूण २८ धरणे असून, त्याद्वारे ग्रामीण व शहरी भागातील लाखो नागरिकांना पिण्याचे पाणी, सिंचन तसेच विविध प्रकल्पांसाठी पाणीपुरवठा केला जातो. भातासह इतर पिकांच्या शेतीलाही या धरणांमधील पाण्याचा मोठा आधार आहे. यंदा जूनच्या पहिल्या तीन आठवड्यांत समाधानकारक पाऊस न झाल्याने जिल्ह्यातील धरणांतील जलसाठा धोकादायकरीत्या घटला होता. अनेक प्रकल्पांमध्ये केवळ २ ते १० टक्के पाणी शिल्लक राहिले होते, तर काही धरणे जवळपास कोरडी पडली होती.परिणामी जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये भीषण पाणीटंचाई निर्माण झाली होती. प्रशासनाला ८४ टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत होता आणि सुमारे दीड लाख नागरिक टँकरच्या पाण्यावर अवलंबून होते. मात्र, जूनच्या शेवटच्या आठवड्यापासून पावसाने जोरदार हजेरी लावल्यानंतर परिस्थितीत मोठा बदल झाला.

सलग झालेल्या मुसळधार पावसामुळे बहुतांश प्रकल्प तुडुंब भरले. त्यामुळे शेतकऱ्यांनाही मोठा दिलासा मिळाला आहे. सध्या श्रीगाव, ढोकशेत, कार्ले, रानीवली, साळोख, अवसरे, उसरण आणि पुनाडे या धरणांमध्ये अद्याप पूर्ण क्षमतेने पाणी साठलेले नसले, तरी उर्वरित २० धरणे शंभर टक्के भरली आहेत.

# सुधागड तालुक्यात पोलीस पाटलाला बेदम मारहाण

## गुन्हा दाखल

**पाली : प्रतिनिधी**

रायगडच्या सुधागड तालुक्यातील नेरे गावच्या बस स्टॉपजवळ एका अत्यंत धक्कादायक आणि कायदा व सुव्यवस्थेचे वाभाडे काढणाऱ्या घटनेत, गावातील कायदा सांभाळणाऱ्या पोलीस पाटलावरच जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पाली पोलीस ठाण्यात आठ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, फिर्यादी चंद्रकांत नथुराम पोकळे हे नेरे गावाचे पोलीस पाटील म्हणून कार्यरत आहेत. १० जुलै रोजी रात्री पावणे नऊ वाजण्याच्या सुमारास ते नेरे गावच्या बस स्टॉपजवळ उभे होते. यावेळी आधी केलेल्या एका तक्रारीचा जुना राग मनात धरून तीन मोटारसायकलवरून आलेल्या तरुणांनी त्यांना अडवले. त्यामध्ये अनिकेत पाठारे याने आपल्या हातातील लोखंडी रॉडने पोलीस पाटलांवर जोरदार वार करून त्यांना गंभीर दुखापत केली.

तर दुसरा तरुण रोहन राऊत याने लोखंडी रॉडने त्यांच्या डोळ्यावर व पोटावर मारहाण केली. आदित्य पाठारे याने त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन तोडून नुकसान केले, तर मिहीर पाठारे याने त्यांना जमिनीवर खाली पाडले. त्यानंतर ऋषिकेश पाठारे, सुधीर पोकळे, साहिल पोकळे आणि अनिल पाठारे यांनी अमानुषपणे लाथाबुयांनी मारहाण केली व त्यांच्या हातातील मोबाईल जमिनीवर फेकून तोडून टाकला.

तसेच चंद्रकांत पोकळे यांच्या खिशातील साडेपाच हजार रुपये झटापटीत खाली पडून नुकसान झाले. या हल्ल्यात पोलीस पाटील गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अलिबाग येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.


या प्रकरणी पाली पोलीस ठाण्यात विविध कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दरम्यान, मारहाण करणाऱ्या व्यक्तींनी देखील पोलीस पाटील चंद्रकांत पोकळे यांच्या विरोधात शिवीगाळ केल्याची तक्रार दाखल केली आहे.

# माथेरान घाटात टेम्पोला अपघात

## आठ पर्यटक जखमी ; रुग्णालयात दाखल

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान घाट रस्त्यात पर्यटकांना घेऊन जाणाऱ्या एका टेम्पोला अपघात झाला असून यामध्ये पर्यटक जखमी झाले आहेत. त्यांना तात्काळ नेरळ येथे एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.



माथेरान पर्यटनस्थळी येण्यासाठी एकमेव नेरळ माथेरान घाट रस्ता आहे. सध्या माथेरान पर्यटनस्थळी वर्षा पर्यटन जोरदार सुरू आहे.दररोज हजारो पर्यटक माथेरान पर्यटनस्थळाला भेट देत आहेत.त्यातच येथे विकेंडला पर्यटकांची मोठी मांदियाळी पहावयास मिळत आहे. शनिवार आणि रविवार एक दिवसीय पर्यटनासाठी गर्दी होत असून येथे टॅक्सी सेवादेखील अपुरी पडत आहे.त्यामुळे पर्यटक मिळेल त्या वाहनाने आपला प्रवास करीत असतात.

रविवारी सायंकाळी या ठिकाणी पर्यटक एका मालवाहू टेम्पोमधून नेरळकडे जात असताना टेम्पो चालकाचा उताराच्या ठिकाणी गाडीवरील ताबा सुटला आणि घाटात टेम्पो पलटी झाला.यामध्ये अठरा ते वीस पर्यटक होते.यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी यापैकी आठ पर्यटकांना जोरदार मार लागला असून त्यांना येथील प्रवासी टॅक्सी चालक मालक संघटनेच्या लोकांनी नेरळ येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले.

डॉक्टरांकडून मिळालेल्या माहिती नुसार हा अपघात गंभीर असून एका पर्यटकाच्या डोक्याला वीस टाके पडले आहेत.एका पर्यटकाच्या पायाला फ्रॅक्चर असून एकाच्या हनुवटीलादेखील फ्रॅक्चर आहे तसेच अजून सहा लोकांनासुद्धा गंभीर दुखापत झाली आहे.

# शिहू-बेणसे विभागातील भातशेती पावसाचे पाणी साचून उद्ध्वस्त ; शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पाऊस आणि महापुरामुळे शिहू-बेणसे झोतीरपाडा विभागातील भातशेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेती हंगामाच्या सुरुवातीलाच आलेल्या या नैसर्गिक संकटामुळे शेतकऱ्यांच्या आशा-अपेक्षांवर पाणी फेरले गेले आहे. अनेक शेतांमध्ये पूराचे पाणी शिरल्याने पेरणीसाठी तयार करून ठेवलेला राब कुजून गेला असून शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे.



यंदा पावसाळ्याच्या प्रारंभी समाधानकारक पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या उत्साहाने भातशेतीची तयारी सुरू केली होती. शेतांची मशागत, बांधबंदिस्ती, बियाणे खरेदी आणि राब तयार करण्यासाठी मोठा खर्च करण्यात आला होता. मात्र, जुलै महिन्याच्या सुरुवातीपासून झालेल्या अतिवृष्टीमुळे परिसरातील नाले, ओढे आणि नदीपात्रांना पूर आला. या पुराचे पाणी थेट शेतीमध्ये शिरल्याने अनेक एकर क्षेत्रातील राब पूर्णपणे खराब झाला आहे. खार बंदिस्ती फुटून खारे पाणी शेतात शिरून शेकडो एकर शेती नापिक होण्याच्या मार्गांवर आहे.

पूरामुळे काही ठिकाणी शेतांमध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ साचला असून पाणी ओसरल्यानंतरही शेतीयोग्य परिस्थिती निर्माण झालेली नाही. परिणामी भातलावणीची कामे ठप्प झाली आहेत. वेळेत लावणी न झाल्यास उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता कृषी क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केली आहे. आधीच महागाईने कंबरडे मोडले असताना वाढलेले बियाणे, खत आणि मजुरीचे दर यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असताना या महापुराने त्यांची चिंता आणखी वाढवली आहे.

शिहू आणि बेणसे परिसरातील अनेक शेतकऱ्यांना आता पुन्हा राब तयार करून नव्याने पेरणी करावी लागणार आहे. त्यामुळे अतिरिक्त खर्चाचा बोजा शेतकऱ्यांवर पडणार असून हंगामही उशिरा सुरू होणार आहे. सततचा पाऊस आणि अधूनमधून पडणारे ऊन यामुळे शेतीची कामे नियोजनानुसार करता येत नसल्याची खंत शेतकरी व्यक्त करत आहेत.

महापुरामुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शासनाने आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी शिहू-बेणसे विभागातील शेतकऱ्यांनी केली आहे. नुकसानभरपाईबरोबरच दुबार पेरणीसाठी बियाणे आणि कृषी साहित्य उपलब्ध करून देण्याची मागणीही शेतकरी करत आहेत. प्रशासनाने तत्काळ दखल घेतली नाही तर आगामी काळात भात उत्पादनावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

> **“ महापुरामुळे आमच्या शेतातील राब पूर्णपणे कुजून गेला आहे. पेरणीसाठी केलेला खर्च वाया गेला. आता पुन्हा नव्याने तयारी करावी लागणार आहे. शेतीवरच आमचा उदरनिर्वाह अवलंबून असल्याने शासनाने तातडीने मदत करणे गरजेचे आहे.**
> **-विश्वनाथ गदमळे**
> शेतकरी, शिहू

# माथेरानमध्ये रस्त्यांच्या डागडुजीला सुरुवात



**माथेरान : बातमीदार**

माथेरान मध्ये पावसाळयात नाले बनलेल्या रस्त्यांमुळे स्थानिक नागरिक,पर्यटक,शालेय विद्यार्थी व ई-रिक्षा चालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.याची स्थानिक प्रशासनाने दखल घेत रस्त्यांच्या डागडुजीच्या कामाला सुरुवात केली आहे.पालिका कार्यालयाच्या समोरील अतिशय खराब झालेल्या रस्त्याची तातडीने दुरुस्ती सुरू करण्यात आली असून याबाबत स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

यंदाच्या वर्षी माथेरान पर्यटनस्थळी पहिल्यांदाच पावसाळयापूर्वी आपत्कालीन तयारी,नागरी वस्त्यांची पाहणी तसेच गटारांची नियमित साफसफाई करण्यात प्रशासन अपयशी ठरल्याची टीका नागरिकांकडून करण्यात येत आहे.सलग आठवडाभर झालेल्या मुसळधार पावसामुळे गटारे तुंबल्याने पावसाचे पाणी थेट रस्त्यांवरून वाहू लागले आणि अनेक रस्त्यांचे अक्षरशः नाल्यात रूपांतर झाले.अनेक ठिकाणी तर रस्त्यांना मोठं मोठे चर पडले आहेत.आता सध्या स्थितीत पावसाने काहीशी विश्रांती घेतल्यामुळे प्रशासनने लागलीच रस्त्यांची डागडुजी करण्यास सुरुवात केली आहे.

दरम्यान केवळ कार्यालयासमोरील रस्ता नव्हेतर शहरातील इतरही खराब झालेल्या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.प्रशासनाने सर्व भागांचे सर्वेक्षण करून आवश्यक त्या ठिकाणी त्वरित उपाययोजना कराव्यात अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे.

# नागोठणे पूरनियंत्रणासाठी अंबा नदी खोलीकरणाचे खासदार तटकरे यांचे निर्देश



**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे पूरनियंत्रणासाठी अंबा नदी खोलीकरण करणे तसेच व्यापाऱ्यांना व नागरिकांना तातडीच्या मदतीचे निर्देश खासदार सुनिल तटकरे यांनी रोहा तालुक्यातील पूरग्रस्त नागरिक, शेतकरी व व्यापाऱ्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी रोहा येथील ज्येष्ठ नागरिक सभागृहात आमदार अनिकेत तटकरे यांच्या निर्देशानुसार झालेल्या आढावा बैठकीत दिले .

बैठकीस खासदार सुनिल तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांच्यासह जिल्हाधिकारी किसन जावळे, रजिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी स्नेहा भोसले, रोहा प्रांत ज्ञानेश्वर खुटवळ रजिप उपाध्यक्ष मधुकर पाटील, रोहा नगराध्यक्षा वनश्री शेडगे, पंचायत समिती सभापती विजया पाशिलकर, उपसभापत संजय मांडलूस्कर, सदस्या समृद्धी कोळी,राष्ट्रवादी काँग्रेस रोहा ता. अध्यक्ष विनोद पाशिलकर, नागोठणे विभाग राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते किशोरभाई जैन, नरेंद्रशेठ जैन, शिवरामभाऊ शिंदे, सदानंद गायकर, मधुकर ठमके,नागोठणे विभाग अध्यक्ष संतोष कोळी, शहर अध्यक्ष बाळासाहेब टके आदी मान्यवरांसह विविध विभागाचे वरिष्ठ शासकीय अधिकारी, नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

या बैठकीदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे नागोठणे विभागाध्यक्ष किशोरभाई जैन यांनी नागोठणे परिसरातील पूरग्रस्त नागरिक व व्यापाऱ्यांच्या अडचणींकडे खासदार सुनिल तटकरे यांचे लक्ष वेधले. तसेच पूरपरिस्थिती हाताळताना रोहा तहसीलदार डॉ. किशोर देशमुख यांच्या कार्यपद्धतीबाबत नाराजी व्यक्त करून आपत्ती व्यवस्थापन अधिक प्रभावी व तत्परपणे राबविण्याची मागणी केली.

बैठकीत नागोठणे शहर व परिसरातील पूरस्थितीवर विशेष चर्चा करण्यात आली. महाड येथील सावित्री नदीच्या धर्तीवर नागोठणेकोलिटी दरम्यान अंबा नदीचे खोलीकरण करून गाळ काढणे व संरक्षण भिंती उभारणे, कानसई ते नागोठणे दरम्यान भूमिगत वीजवाहिन्या टाकणे तसेच वरवठणे येथील ऐतिहासिक जुन्या पुलाचे जतन करून नव्या पुलाच्या बांधकामाचा अंदाजपत्रक तयार करण्याचे खासदार सुनिल तटकरे यांनी रजिपच्या बांधकाम विभागाला निर्देश दिले..

नागोठणे व परिसरातील पूरग्रस्त व्यापाऱ्यांचे पंचनामे करून त्यांना तात्काळ ५० हजार रुपयांची मदत, तर घरांमध्ये पाणी शिरून नुकसान झालेल्या प्रत्येक कुटुंबाला ५ हजार रुपयांची तातडीची आर्थिक मदत देण्याचे आदेश महसूल विभागाला देण्यात आले. शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन पिकांचे पंचनामे करून नुकसानभरपाई त्वरित देण्याचे निर्देश कृषी विभागालाही देण्यात आले.

यावेळी खासदार सुनिल तटकरे यांनी विमा कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरत पूररेषेच्या कारणास्तव कोणतीही अडचण न आणता नागोठण्यातील विमाधारक व्यापाऱ्यांचे दावे तत्काळ निकाली काढण्याचे आदेश खासदार सुनिल तटकरे यांनी दिले.

राज्य व केंद्र शासनाकडून विकासकामे व नुकसान भरपाईसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असे आश्वासन त्यांनी दिले.

# रघुजीराजे आंग्रे यांची नागोठण्यातील आयुर्वेदिक महाविद्यालयास भेट

**नागोठणे : बातमीदार**

मराठा आरमाराचे प्रमुख सरखेल कान्होजीराजे आंग्रे यांचे नववे वंशज सरदार रघुजीराजे आंग्रे यांनी शनिवारी नागोठणेजवळील वेलशेत येथील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या विद्यासंकुलातील श्रीमती शांताबाई ओटरमल जैन आयुर्वेदिक मेडिकल कॉलेजला सदिच्छा भेट दिली. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किशोर जैन यांनी त्यांचे यथोचित स्वागत केले.



किशोर जैन यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक उपक्रमांची व भावी योजनांची माहिती रघुजीराजे आंग्रे यांना दिली. श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ व गाज फाउंडेशनचे अध्यक्ष म्हणून गड-किल्ल्यांचे संवर्धन, ऐतिहासिक वारशाचे जतन तसेच भावी पिढीत स्वराज्याचा इतिहास व राष्ट्रप्रेम जागविण्यासाठी रघुजीराजे आंग्रे करीत असलेले कार्य प्रेरणादायी असल्याचे गौरवोद्गार यावेळी किशोर जैन यांनी काढले.

कोकणातील आंग्रे घराण्याचा वारसा जपत मराठा इतिहासाच्या प्रसारासाठी सरदार रघुजीराजे आंग्रे यांच्या सुरू असलेल्या उपक्रमांना किशोर जैन यांनी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालय व्यवस्थापनाच्या वतीने या सदिच्छा भेटीबद्दल त्यांचे आभारही व्यक्त करण्यात आले.

कान्होजीराजे आंग्रे यांचे नववे वंशज असलेले सरदार रघुजीराजे आंग्रे यांच्या नागोठण्यातील या भेटीच्या वेळी नरेंद्र जैन, शिवराम शिंदे, भारतीय एज्युकेशन सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिक जैन, श्रीमती शांताबाई ओटरमल जैन आयुर्वेदिक मेडिकल कॉलेजचे रजिस्ट्रार प्रा. वैभव नांदगावकर, मंदार परांजपे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी विविध विषयांवर मनमोकळेपणाने चर्चा केली.

# सिनर सलग दुसऱ्यांदा विजेता

## विम्बल्डन फायनलमध्ये झ्वेरेव्हवर संघर्षमय मात



**लंडन : वृत्तसंस्था**

**विम्बल्डन पुरुष एकेरी स्पर्धेच्या अंतिम सामन्यात इटलीच्या जानिक सिनर याने दमदार खेळ करत जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव्ह याचा ६-७, ७-६, ६-३, ६-४ असा पराभव केला. या विजयासह सिनरने सलग दुसऱ्यांदा विम्बल्डन विजेतेपद आपल्या नावावर कायम राखले.**

अंतिम सामना अतिशय चुरशीचा झाला. पहिल्या सेटमध्ये दोन्ही खेळाडूंमध्ये जबरदस्त संघर्ष पाहायला मिळाला. अखेर टाय-ब्रेकमध्ये ९-७ अशी बाजी मारत झ्वेरेव्हने पहिला सेट जिंकला, मात्र त्यानंतर सिनरने शानदार पुनरागमन केले. दुसरा सेटही टाय-ब्रेकमध्ये गेला, पण यावेळी सिनरने ७-२ अशी सरशी करत सामन्यात बरोबरी साधली.

तिसऱ्या सेटमध्ये सामना निर्णायक वळणावर पोहचला. याचदरम्यान झ्वेरेव्हच्या गुडघ्याला दुखापतीची भीती निर्माण झाली. त्याचा परिणाम त्याच्या खेळावर दिसून आला आणि सिनरने त्याची सर्व्हिस ब्रेक करत ६-३ असा सेट आपल्या नावावर केला.


चौथ्या सेटमध्येही सिनरने झ्वेरेव्हची सर्व्हिस ब्रेक करत त्याने ६-४ असा सेट जिंकला आणि सलग दुसरे विम्बल्डन पुरुष एकेरी विजेतेपद पटकावत इतिहासात आणखी एक सुवर्ण अध्याय जोडला. या विजयासह सिन्नरची ग्रँडस्लॅम अंतिम फेरीतील कामगिरी पाच विजय आणि दोन पराभव अशी झाली आहे तसेच झ्वेरेव्हविरुद्धच्या हेड-टू-हेड विक्रमातही त्याने आपले वर्चस्व सिद्ध केले.

### दमदार पुनरागमन

फ्रेंच ओपन स्पर्धेत दुसऱ्याच फेरीत अनपेक्षित पराभव पत्करल्यानंतर सिन्नरवर टीका झाली होती. जुआन मॅन्युएल सेरुंडोलोकडून त्याला पाच सेटमध्ये हार स्वीकारावी लागली होती. दुसरीकडे झ्वेरेव्हने याच स्पर्धेत शानदार कामगिरी करत कारकिर्दीतील पहिले ग्रँडस्लॅम जेतेपद पटकावले होते, मात्र विम्बल्डनमध्ये सिन्नरने दमदार पुनरागमन केले. उपांत्य फेरीत त्याने सलग दुसऱ्या वर्षी नोव्हाक जोकोव्हिचचा सरळ सेटमध्ये पराभव केला आणि अंतिम फेरीतही तोच आत्मविश्वास कायम ठेवला. विम्बल्डन पुरुष एकेरीचे जेतेपद यशस्वीपणे कायम राखणारा तो १०वा खेळाडू आहे.

# कोच फ्लेमिंग यांनी सोडली 'सीएसके'ची साथ

**चेन्नई : वृत्तसंस्था**



आयपीएलमधील सर्वात यशस्वी संघांपैकी एक असलेल्या चेन्नई सुपर किंग्स (सीएसके)चे मुख्य प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंग यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. तब्बल १७ वर्षांच्या प्रदीर्घ आणि अत्यंत यशस्वी कार्यकाळानंतर त्यांनी चेन्नई संघाचे मुख्य प्रशिक्षकपद सोडण्याचा निर्णय घेतला आहे.

फ्लेमिंग हे आयपीएलच्या सुरुवातीच्या काळापासून म्हणजेच २००८पासून चेन्नई सुपर किंग्स या फ्रेंचायझीशी जोडले गेले होते. सुरुवातीला त्यांनी चेन्नई संघासाठी खेळाडू म्हणून मैदानात भूमिका बजावली आणि त्यानंतर लगेचच त्यांच्यावर मुख्य प्रशिक्षकपदाची धुरा सोपवण्यात आली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सीएसकेने आयपीएलच्या इतिहासात अनेक चांगल्या बाबी अनुभवल्या. महेंद्रसिंह धोनीच्या कर्णधारपदाला आणि फ्लेमिंग यांच्या प्रशिक्षकपदाला आयपीएलमधील सर्वात यशस्वी जोडी मानली गेली. दरम्यान, आता माजी क्रिकेटपटू हेमांग बदानी प्रशिक्षकपदाची धुरा सांभाळण्याची शक्यता आहे.

# ग्रासरूट डेव्हलपमेंट लीग उत्साहात

## युवा फुटबॉलपटूंच्या कौशल्याला मिळाले व्यासपीठ




**पनवेल : वार्ताहर**

विजया हरिभाऊ पोटे आणि हरिभाऊ नारायण पोटे यांच्या स्मरणार्थ वेनम स्पोर्ट्स फुटबॉल अकादमीच्या वतीने आयोजित करण्यात आलेली '+१ ग्रासरूट डेव्हलपमेंट लीग २०२६ ही फुटबॉल स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. लहान वयातील फुटबॉलपटूंना स्पर्धात्मक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेला खेळाडू, पालक आणि क्रीडाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

स्पर्धेच्या समारोपप्रसंगी पनवेल महापालिकेचे नगरसेवक सुमित झुंजारराव, उरणचे उद्योजक दीपकशेठ ठाकूर, राज ठाकूर, मानस ठाकूर तसेच वेनम अकादमीचे तन्मय यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी युवा खेळाडूंना मार्गदर्शन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.


स्पर्धेतील अंडर-१० गटात अंतिम सामन्यात Ace FC संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकावले, तर Venom FA संघ उपविजेता ठरला. तसेच अंडर ८ गटात Kickstart FA संघाने विजेतेपद मिळविले, तर Ace FC संघाने उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

स्पर्धेदरम्यान बाल फुटबॉलपटूंनी उत्कृष्ट कौशल्य, शिस्त आणि खेळाडूवृत्तीचे दर्शन घडविले. ग्रामीण व शहरी भागातील उदयोन्मुख खेळाडूंना संधी देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या लीगमुळे अनेक नवोदित खेळाडूंना आपली प्रतिभा सादर करण्याची संधी मिळाली.

यावेळी बोलताना उरणचे उद्योजक दीपकशेठ ठाकूर यांनी या स्पर्धेचे कौतुक करून आगामी काळात या स्पर्धेसाठी माझ्याकडून पूर्णतः मदत करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

# श्रावणी सांगळेने तीन पदके जिंकली

**नाशिक : प्रतिनिधी**



चीनमधील ऑर्डोस येथे आयोजित पहिल्या आशियाई २३ वर्षांआतील अॅथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये नाशिकच्या श्रावणी सांगळेने दोन सुवर्ण आणि एक कांस्यपदक अशा तीन पदकांची कमाई करून ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

मिश्र (मिक्स्ड) ४४०० रिले प्रकारात भारतीय संघाने सुवर्णपदक पटकावले. अंतिम फेरीत भारतीय संघ चीनमागे होता, मात्र शेवटच्या (अँकर) टप्प्यात श्रावणीने अफाट वेगाने चीनच्या धावपटूला मागे टाकले आणि भारताच्या सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केले. अस्तिक प्रधान, सँड्रामोल साबू, सेतू मिश्रा आणि श्रावणी यांचा समावेश असलेल्या भारतीय संघाने ३:१८.६४ सेकंद वेळेसह सुवर्ण जिंकले.

# क्रिकेटच्या पंढरीत भारतीय महिला संघाचा ऐतिहासिक विजय

**लंडन : वृत्तसंस्था**

क्रिकेटची पंढरी लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानावर हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघाने इतिहास रचला.



तब्बल १४२ वर्षांच्या इतिहासात प्रथमच या प्रतिष्ठित मैदानावर महिला कसोटी सामना खेळवण्यात आला. भारतीय संघाने सर्वोत्तम कामगिरी करत इंग्लंडला २७० धावांनी पराभूत करत ऐतिहासिक विजय मिळवला.

यजमान इंग्लंडच्या संघाने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पहिल्या डावात स्मृती मानधनाने १०८ चेंडूत ८३ धावांची दमदार खेळी केल्यावर कर्णधार हरमनप्रीत कौर ५८ (१२१) आणि दीप्ती शर्माच्या अर्धशतकाच्या जोरावर भारतीय संघाने पहिल्या डावात सर्व बाद २८५ धावा केल्या होत्या.

घरच्या मैदानावर खेळणाऱ्या इंग्लंडच्या संघाचा पहिला डाव अवघ्या १७० धावांत आटोपला. कर्णधार नॅट सायव्हर ब्रंट हिने ८५ चेंडूत केलेल्या ४४ धावा आणि एमी जोन्स हिने ६२ चेंडूत केलेल्या अर्धशतकाशिवाय एकीलाही मैदानात तग धरता आली नाही. भारताकडून क्रांती गौडने फक्त ३७ धावा खर्च करताना पाच विकेट्स घेतल्या. सर्वोत्तम गोलंदाजीच्या जोरावर भारतीय संघाने ११५ धावांची मजबूत आघाडी घेतली होती.

दुसऱ्या डावात स्मृती मानधना हिने सलग दुसऱ्या डावात अर्धशतकी खेळी साकारली. ती १३० चेंडूत ७० धावांची खेळी करून बाद झाल्यावर यास्तिका भाटियाने ऐतिहासिक आणि अविस्मरणीय शतक साजरे केले. लॉर्ड्सच्या मैदानात शतक झळकवणारी ती पहिली महिला बॅटर ठरली. तिने १५८ चेंडूत ११३ धावांची खेळी केली. भारतीय संघाने सात बाद ३४१ धावांवर डाव घोषित करत इंग्लंडच्या संघासमोर ४५७ धावांचे टार्गेट सेट केले होते. इंग्लंडचा दुसरा डाव १८६ धावांत आटोपला. या डावात स्नेह राणा हिने सर्वाधिक चार विकेट्स घेतल्या.

# विश्वचषक स्पर्धेत अव्वल चार संघ उपांत्य फेरीत

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या उपांत्य फेरीच्या लढती रविवारी निश्चित झाल्या.



फ्रान्स आणि स्पेन यांच्यापाठोपाठ इंग्लंड आणि अर्जेंटिनाने आपापले उपांत्यपूर्व फेरीचे सामने जिंकून वाटचाल सुरू ठेवली. योगायोग म्हणजे फ्रान्स, स्पेन, अर्जेंटिना आणि इंग्लंड हे चारही संघ फिफा क्रमवारीत अव्वल चार क्रमांकांवर आहेत.

चार आजी-माजी जगज्जेते विरुद्ध चार बिगर-जगज्जेत्या संघांतील द्वंद्व अखेर प्रस्थापित संघांनीच जिंकले. चारही उपांत्यपूर्व लढतींपैकी एकही पेनल्टी शूट-आऊटपर्यंत न जाण्याचा दुर्मीळ प्रकार यंदा दिसून आला तसेच १९९०नंतर प्रथमच आणि विश्वचषक स्पर्धेच्या इतिहासात केवळ तिसऱ्यांदाच उपांत्य फेरीतील प्रत्येक संघाने किमान एकदा तरी विश्वचषक जिंकलेला आहे.

अर्जेंटिना आणि फ्रान्स हे गेल्या विश्वचषक स्पर्धेत अंतिम फेरीत भिडले होते. त्यांच्यात जगज्जेतेपदासाठी फेरलढतीची शक्यता नाकारता येत नाही. फ्रान्सचा गोलधडाका, स्पेनचा अभेद्य बचाव, इंग्लंडची बेलिंगहॅम-केन जोडी आणि अर्जेंटिनाच्या लिओनेल मेसीची ऊर्जा आणि इच्छाशक्ती त्या-त्या संघांसाठी निर्णायक ठरेल.

# आळंदी ते पंढरपूर 'धाववारी'

## ३५ धावपटूंचा उत्स्फूर्त सहभाग

**पनवेल : वार्ताहर**

वारकरी संप्रदायाची परंपरा, श्रद्धा आणि आधुनिक फिटनेस यांचा सुंदर संगम घडवणारा एक अनोखा उपक्रम पनवेलमधील डॉन अॅटलिट्स या मॅरेथॉन प्रशिक्षण संस्थेने हाती घेतला आहे. संस्थेच्या वतीने आळंदी ते पंढरपूर ही वारी चक्क धावत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले असून या उपक्रमाला धावपटूंकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.

या धाववारीचे नियोजन करण्यामध्ये पनवेलचे रहिवासी माधव मदरून आणि संजय मोतलिंग तसेच खारघरच्या अश्विनी सोनावणे यांचा विशेष सहभाग आहे. प्रशिक्षक ज्ञानेश्वर तिडके, श्रद्धा, शिस्त, आरोग्य आणि सामाजिक एकात्मता यांचा संदेश देणारा हा उपक्रम अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

ही धाववारी एकूण पाच टप्प्यांत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यामध्ये आळंदी ते जेजुरी (६० किमी), जेजुरी ते फलटण (५२ किमी), फलटण ते नातेपुते (४० किमी), नातेपुते ते टप्पा (४७ किमी) आणि टप्पा ते पंढरपूर (२१ किमी) असा प्रवास धावत पूर्ण केला जाणार आहे.


या अनोख्या वारीसाठी पनवेल येथून ११ जुलै रोजी प्रस्थान करण्यात आले असून १७ जुलैला रोजी पंढरपूर येथे वारीचा समारोप होणार आहे. या उपक्रमात क्लबचे सुमारे ३५ धावपटू प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरूपात सहभागी झाले आहेत.




श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर शिवाजीनगर

वर्ष २३ वे | || ॐ श्री बाळकृष्णाय नमः || | स्थापना २००३

# पुण्यतिथी सोहळा


श्री समर्थ सद्गुरु बाळकृष्ण महाराज (नंदेश्वर)


श्री समर्थ सद्गुरु भाऊसाहेब महाराज (नंदेश्वर)


स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि.नगर) पिताजी श्री. चांगू काना ठाकूर


स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि.नगर) माताजी श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर


श्री समर्थ सद्गुरु दादामहाराज (मुंबई)

आपणांस कळविण्यात येते की, आमचे वडिल स्वानंद सुख निवासी 'श्री. चांगू काना ठाकूर' यांची पुण्यतिथी मिती आषाढ शु. ०२, शके १९४८, गुरुवार दिनांक १६/०७/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता श्री समर्थ दासबोध वाचन ग्रंथ श्री बाळकृष्ण महाराज यांचे चरित्रामृत ग्रंथाचे पारायण प्रारंभ, आषाढ शु. ०३, विनायकी चतुर्थी, शके १९४८, शुक्रवार दिनांक १७/०७/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता पुण्यतिथी निमीत्ताने माऊलीवर पुष्पवृष्टी शिवाजीनगर येथे साजरी होणार आहे. तरी आपण सर्व नातेवाईक, गुरूबंधू भगिनींनी उपस्थित रहावे, ही विनंती.

## कार्यक्रम

**गुरुवार, दिनांक १६/०७/२०२६**

| | |
|---|---|
| सकाळी ०९.०० ते १०.०० भजन | बाळकृष्ण महाराज संगीत भजन, न्हावाखाडी (उत्तरपाडा)<br>बुवा : गणपत ठाकूर, नितीन ठाकूर, श्री. रमण ठाकूर<br>पखवाज : आत्माराम मोकल, जयराम म्हात्रे |
| सकाळी १०.०० ते १२.०० प्रवचन | श्री. स. स. बाळासाहेब महाराज (नंदेश्वर), श्री. भागवत साहेब (पुणे), ह. भ. प. आप्पा पांचाळ महाराज (चिपळूण),श्री. रमण ठाकूर (न्हावाखाडी), श्री. अरुणशेठ ठाकूर |
| दुपारी ०२.०० ते ०३.०० भजन | श्री विश्वंभर भजन मंडळ, गव्हाण, गायक : हेमंत कोळी,<br>रविराज कोळी आणि मंडळी |
| दुपारी ०३.०० ते ०५.०० भजन | भावभक्ती महीला मंडळ, गव्हाण - कोपर, गायीका : श्रीमती. हिराबाई घरत,<br>सौ. आनंदी घरत, सौ. रत्नप्रभा घरत, सौ. चंद्रभागा घरत,<br>श्री गुरुकृपा महिला भजन मंडळ - कोपर, गायीका : सौ. सुप्रिया घरत<br>वादक : तुषार घरत, टाळकरी - सौ. शितल घरत, कोपर |
| सायं. ०५.०० ते ०६.०० भजन | संत जनाबाई भजन मंडळ, विहीघर, गायीका : पुनम ठाकूर, रूपम वास्कर<br>श्री. हर्षल फडके, पखवाज : श्री. पवन फडके |
| सायं. ०६.०० ते ०७.०० आरती | माऊलींची आरती |
| सायं. ०७.०० ते ०८.०० | एकनाथी भागवत ग्रंथ वाचन / ध्यान |
| सायं. ०८.०० ते ०९.०० भजन | दत्त प्रासादिक भजन मंडळ (कोपर), बुवा : श्री. वसंतशेठ पाटील (कोपर)<br>पखवाज : वैष्णव देशमुख |
| सायं. ०९.०० ते ११.०० कीर्तन | **प्रभोदनकार :** ह.भ.प. महेशजी महाराज साळुंखे,<br>श्री क्षेत्र पाटणोली (पनवेल), वादक : ह.भ.प. आदित्य पाटील,<br>गायक : ह.भ.प. कल्पेश पाटील, अदित्य पाटील, विनायक पाटील |
| रात्री ११ नंतर | रात्रीचे बारा अभंग, जागर (भजन-सार्वजनिक गुरूबंधू भगिनी) |

**शुक्रवार, दिनांक १७/०७/२०२६**

| | |
|---|---|
| सकाळी ०९.०० ते १०.०० भजन | नादब्रम्हा भजन मंडळ (खारघर-रांजणपाडा) बुवा : श्री. निवृती बुवा चौधरी, वसंतशेठ पाटील (कोपर), ज्ञानेश्वर म्हात्रे (गव्हाण), गणपत ठाकूर (कोपर), भाऊ ठाकूर, नितीन ठाकूर (त. पाडा), श्री. महेश पाटील (न्हावा),<br>पखवाज : निलेश पाटील (कोपरा) |
| सकाळी १०.०० ते १२.०० प्रवचन | श्री. स. स. बाळासाहेब महाराज (नंदेश्वर) |
| दुपारी १२.०० वाजता | श्री. माऊलीवर पुष्पवृष्टी |

*** कार्यक्रमाचे ठिकाण ***

श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर, शिवाजीनगर
मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण,
ता. पनवेल, जि. रायगड.
फोन नं. ९१६७९९१०४५

*** व्यवस्थापक ***

देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय)
शिवाजीनगर- गव्हाण- न्हावे- न्हावेखाडी- कोपर (संचलित)

*** संयोजक ***

श्री. रामशेठ ठाकूर (माजी खासदार)
आणि परिवार, ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com